





पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३०३ ■ बुधवार, दि.१३ मे २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com


## जिल्ह्यात उष्णतेची लाट ; हवामान विभागाचा इशारा



♦ बुधवार, गुरुवार आणि शुक्रवार उष्णतेची लाट

प्रतिनिधी १३ मे

**अकोला :** नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागा कडून १३ ते १६ मे दरम्यान अकोला, तसेच विदर्भातील इतर जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट राहण्याची शक्यता व्यक्त केली आहे. त्यानुसार आवश्यक दक्षता घेण्याबाबत आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

अकोल्यात मंगळवारी सर्वाधिक ४५.६ अंश सेल्सिअस इतके तापमान नोंदवण्यात आले. बुधवार, गुरुवार आणि शुक्रवार अकोल्यात उष्णतेची लाट असेल असा इशारा हवामान खात्याने दिला आहे. दरम्यान, नैऋत्य मोसमी वारे त्याच्या नियोजित वेळेच्या ३ दिवस आधीच १५ ते १६ मे दरम्यान अंदमान- निकोबार बेटांवर दाखल होण्याचा अंदाज हवामान विभागाने सोमवारी वर्तवला आहे. नागरिकांनी दुपारी १२ ते ४ या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे, बाहेर तापमान अधिक असल्यास शारीरिक श्रमाची कामे टाळावीत, उन्हात वाहने शक्यतो चालवू नये, ज्वलनशील पदार्थापासून शक्यतो दूर राहावे, लहान मुले व पाळीव प्राण्यांना गेट बंद असलेल्या वाहनात तसेच पार्क केलेल्या वाहनात ठेवू नयेत, तहान लागलेली नसली तरी जास्तीत जास्त पाणी पिण्यात यावे, अशक्तपणा, स्थूलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा. विदर्भात उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.

# रोहित पवारांच्या दाव्याने राजकारणात खळबळ

प्रतिनिधी १३ मे



**मुंबई :** राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आणि खासदार सुनील तटकरे यांनी काल रात्री शरद पवार यांची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. मात्र शरद पवारांसोबतची भेट ही केवळ तब्येतीची विचारपूस करण्यासाठी होती, असं सुनील तटकरेंनी स्पष्ट केलं. परंतु आता शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी खळबळजनक दावा केला आहे.

२२ आमदार घेऊन सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल हे भाजपमधुनच लढणार आहेत. एकनाथ शिंदेंच्या पक्षाचे देखील काही आमदार भाजपच्या गळाला लागले आहे, असा दावा रोहित पवारांनी आज पत्रकार परिषद घेऊन केला. मावळचा आमदार (सुनिल शेळके ) भाजपमधूनच लढणार आहेत, असा मोठा दावा रोहित पवारांनी केला आहे. तसेच शरद पवारांसोबतच्या भेटीवर सुनील तटकरेंना कदाचित सिल्व्हर ओकचा चहा आवडत असेल, असा टोलाही रोहित पवारांनी लगावला.

काल आदरणीय शरद पवार साहेबांची त्यांच्या सिल्व्हर ओक या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली, प्रकृतीची विचारपूस केली. गेल्या काही काळात साहेबांची तब्येत ठीक नव्हती, त्याकरता ते ब्रीचकँडी रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाले होते. तेव्हापासून त्यांच्या भेटीसाठी जाण्याचे प्रयोजन होते, परंतु मधल्या काळात वेळ जुळून येत नसल्याने ही भेट अखेरीस काल झाली. या भेटीत कुठल्याही राजकीय विषयांवर चर्चा झाली नाही, तसा कुठला उद्देशही या भेटीचा नव्हता.

गेली सहा दशके साहेब देशाच्या राजकारणात महत्वाचे योगदान देत आहेत. मी दीर्घकाळ त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम केले, माझ्या राजकीय जडणघडणीत त्यांचा मोठा वाटा आहे. त्यामुळे भेट देणे, तब्येतीची विचारपूस करणे हा महाराष्ट्राच्या राजकारणापलीकडच्या समृद्ध राजकीय परंपरेचा भाग आहे. या परंपरेला अनुसरूनच ही भेट झाली. साहेबांची प्रकृती आता उत्तम असून त्यांची काम करण्याची ऊर्जा पूर्वीसारखीच आजही कायम आहे, असं सुनील तटकरे एक्सवर आज पोस्ट करत म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांमध्ये सुरुवातीला असुरक्षितता होती. पण उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार काम करत आहेत, दृढता दिसते. महिना दोन महिन्यात पक्ष स्थिरस्थावर होईल. त्यांच्या पक्षातील कोणालाही आम्ही आमच्या पक्षात घेणार नाही. राष्ट्रवादीचे आमदार फोडणार नाही. पण त्यांच्या पक्षाला जी मदत लागेल ती करू, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले होते.

### सुनील तटकरे, प्रफुल पटेल काय निर्णय घेणार ?

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांची त्यांच्या सिल्व्हर ओक निवासस्थानी भेट घेतली आणि त्यानंतर वेगवेगळया चर्चांना उधाण आलं आहे. मंगळवारी दिवसभर सुनील तटकरे यांना महासचिव आणि प्रफुल पटेल यांना राष्ट्रीय कार्याध्यक्ष पदावरून काढले आहे, अशी चर्चा सुरू असताना त्याचवेळी सुनील तटकरे यांनी शरद पवारांची भेट घेतल्यामुळे आता काही वेगळा निर्णय तर हे दोन्ही नेते घेत नाहीत ना अशा चर्चेला सुरुवात झाली आहे. कारण सुनील तटकरे यांना आपण महासचिव पदावर आता असणार की नसणार असा प्रश्न विचारताच त्यांनी या प्रश्नावर मौन बाळगल्याची पाहिला मिळाल. सुनेत्रा पवार यांच्या एक्स अकाउंटवरून सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांच्या पदावरून सुरू असलेल्या गोंधळावर पोस्ट करत टायपो मिस्टेक असल्याचं सांगण्यात आलं आहे. परंतु मार्च महिन्यात देखील निवडणूक आयोगाला पाठवण्यात आलेल्या राष्ट्रीय कार्यकारणीच्या मिनिट्समध्ये देखील सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांच्या पदांपुढे काहीच न लिहिल्यामुळे गोंधळ निर्माण झाला होता. त्यामुळे आता पुन्हा हाच प्रकार घडल्यामुळे सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल काय निर्णय घेणार याकडे लक्ष लागलं आहे.

## सोन्यावरील आयात शुल्क थेट 15 टक्के !

♦ मोदी सरकारचा मोठा दणका! सराफा बाजारात खळबळ

प्रतिनिधी १३ मे

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना पुढील एक वर्ष सोन्याची खरेदी टाळण्याचे आवाहन केल्यानंतर केंद्र सरकारने सोन्याबाबत मोठा आर्थिक निर्णय घेतला आहे. सरकारने सोन्यावरील आयात शुल्कात मोठी वाढ करत ते ६ टक्क्यांवरून थेट १५ टक्क्यांपर्यंत वाढवले आहे. या निर्णयानंतर देशातील सराफा बाजारात मोठी खळबळ उडाली असून, सोन्या-चांदीच्या दरात मोठी वाढ नोंदवली गेली आहे. केंद्र सरकारकडून बुधवारी यासंदर्भातील अधिसूचना जारी करण्यात आली. मौल्यवान धातूंची आयात कमी करणे, परकीय चलन साठ्यावरचा ताण कमी करणे आणि आर्थिक संतुलन राखणे या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले जात आहे. मात्र, या निर्णयाचा थेट परिणाम ग्राहकांवर होत असून, सोनं आणि चांदी अधिक महाग झाली आहेत. दरम्यान, सरकारच्या या निर्णयामुळे पुढील काळात भारतीय बाजारात सोन्याचे दर आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. नागरिकांनी अनावश्यक सोन्याची खरेदी टाळावी, असे आवाहन सरकारकडून वारंवार करण्यात येत असून, भविष्यात सोन्याच्या खरेदीवर आणखी काही निर्बंध लागू होण्याची शक्यताही वर्तवली जात आहे.

### एकाच दिवसात सोन्यात ९ तर चांदीत १६ हजारांची वाढ!

◆ एमसीएक्सवरील आकडेवारीनुसार, १३ मे रोजी सोन्याच्या दरात तब्बल ९ हजार रुपयांची वाढ झाली असून, प्रति १० ग्रॅम सोन्याचा भाव १,६२,६४८ रुपयांवर पोहोचला आहे. तर चांदीच्या दरात १६ हजार रुपयांची वाढ होऊन प्रति किलो चांदीचा भाव २,६५,८०५ रुपयांवर गेला आहे. जागतिक बाजारातही सोन्या-चांदीच्या दरात वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे.

## बारामतीत पुन्हा विमान कोसळलं !

प्रतिनिधी १३ मे

**पुणे :** बारामती तालुक्यात पुन्हा एकदा प्रशिक्षणासाठी वापरलं जाणारं विमान खाली पडल्याची दुर्घटना घटना घडली आहे. बारामतीतील गोजुबावी गावाच्या हद्दीत रेडबर्ड कंपनीचे प्रशिक्षणासाठी वापरलं जाणारं विमान कोसळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. सुदैवाने या अपघातात वैमानिक सुरक्षित असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

या दुर्घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार, हे विमान प्रशिक्षणासाठी उड्डाण करत असताना अचानक तांत्रिक बिघाड झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र नेमकं विमान कशामुळे कोसळलं, याचं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर पोलिस आणि संबंधित यंत्रणा तातडीने दाखल झाल्या. विमान कोसळल्यानंतर परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झाले होते. दुर्घटनाग्रस्त विमान शेतजमिनीत पडल्याची माहिती मिळत आहे. सुदैवाने मोठी जीवितहानी



टळली. विशेष म्हणजे, याच गोजुबाबी गावाच्या परिसरात यापूर्वीही उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाचा अपघात झाला होता. त्यामुळे पुन्हा एकदा त्याच परिसरात विमान दुर्घटना घडल्याने चर्चांना उधाण आले आहे. दरम्यान, पोलिसांनी परिसराचा ताबा घेतला असून अपघातामागील नेमकं कारण शोधण्यासाठी तपास सुरू करण्यात आला आहे. तर या विमानाची दुर्घटना घडली.

## पंतप्रधान मोदींच्या आवाहनाला त्यांच्या पक्षातील नेत्यांकडून खो !

प्रतिनिधी १३ मे

**भोपाळ:** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पेट्रोल आणि डिझेल वाचवण्याचे, इंधनाचा जपून वापर करण्याचे आवाहन २४ तासांत दोनदा केले. जागतिक परिस्थितीचा दाखला देत त्यांनी ऊर्जा संकटाचा हवाला दिला. वाहनांचा वापर कमीत करा. सार्वजनिक वाहतुकीचा अधिकाधिक करा, असे आवाहन मोदींनी केले होते. पण त्यांच्या आवाहनाला त्यांच्याच पक्षाच्या नेत्यांनी खो दिल्याचा प्रत्यय मध्य प्रदेशातील एका घटनेतून आला आहे. भोपाळमध्ये भाजप नेते सौरभ सिंह ठाकूर पाठ्य पुस्तक परिषदेच्या अध्यक्ष पदाचा कार्यभार स्वीकारण्यासाठी पोहोचले. त्यावेळी त्यांच्या पदग्रहण सोहळ्यापेक्षा चर्चा त्यांनी सोबत आणलेल्या वाहनांच्या ताफ्याची झाली. वाहनांचा प्रचंड मोठा ताफा घेऊन त्यांनी उज्जैनहून भोपाळ अंतर कापलं. या ताफ्यात २०० पेक्षा अधिक गाड्या होत्या.

♦ भाजप नेत्याचा २०० वाहनांच्या ताफ्यासह प्रवास



### पंतप्रधानांनी ताफ्यातील गाड्यांची संख्या केली निम्मी

देशातील जनतेला इंधन बचतीचे आवाहन करत असतानाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतः आपल्या ताफ्यातील गाड्यांची संख्या निम्मी केली आहे. याबाबत त्यांनी आपल्या सुरक्षेसाठी तैनात असलेल्या 'स्पेशल प्रोटेक्शन ग्रुप'ला आदेश दिले आहेत. पंतप्रधानांनी आपल्या ताफ्यात ५० टक्के कपात केली आहे. मात्र त्यासाठी नवीन खरेदी करू नये, असे निर्देश एसपीजीला देण्यात आले आहेत.

## वाशिमची ती व्यक्ती एटीएसच्या ताब्यात

प्रतिनिधी १३ मे

**अकोला :** महाराष्ट्र ए टी एस ची राज्यात मोठी कारवाई सुरु आहे. पाकिस्तानी टोळीशी संबंधित गुन्हेगारांच्या मुसक्या आवळल्या जात असून अशातच अकोल्यातून एकाला ताब्यात घेतल्याची सूत्राची माहिती. ताब्यात घेण्यात आलेला व्यक्ती वाशिम जिल्ह्यातील असल्याची प्राथमिक माहिती. आज अकोला जिल्ह्यातून त्याला ताब्यात घेतले. महाराष्ट्र एटीएसकडून राज्यात सकाळपासून विविध जिल्ह्यात छापेमारी सुरू केली. पाकिस्तानी गुंड शहजाद भट्टीच्या टोळीशी संबंधित असलेल्या गुन्हेगारांवर एटीएसकडून नजर ठेवल्या जात आहे. डोग्रा गँगच्या पावलावर पाऊल ठेवू पाहणाऱ्या व्यक्तींवर एटीएसकडून कारवाई सुरु असून, त्यांच्या मुसक्या आवळल्या आहेत. आज सकाळी अकोला जिल्ह्यातून अशाच संशयित व्यक्तीला एटीएसने चौकशीसाठी ताब्यात घेतले.

## सोनिया गांधी रूग्णालयात दाखल

प्रतिनिधी १३ मे

**अकोला :** नवी दिल्ली : काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांना गुरुग्राम येथील मेदांता रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची महत्त्वाची माहिती समोर आली आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, किरकोळ शस्त्रक्रियेसाठी त्यांना रुग्णालयात आणण्यात आले आहे. मात्र ही शस्त्रक्रिया नेमकी कोणत्या



आजारासंदर्भात आहे, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती जाहीर करण्यात आलेली नाही. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, डॉक्टरांच्या विशेष देखरेखेखाली त्यांच्यावर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगितले जात आहे. सोनिया गांधी यांच्या प्रकृतीबाबतची बातमी समोर आल्यानंतर काँग्रेस कार्यकर्ते आणि समर्थकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, काँग्रेस पक्षाकडून अद्याप अधिकृत निवेदन जारी करण्यात आलेले नसले तरी लवकरच याबाबत अधिक माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## सर्व परदेश दौरे रद्द करा – मुख्यमंत्री

प्रतिनिधी १३ मे

मंत्री आणि अधिकाऱ्यांना आदेश
राज्यातील मंत्र्यांच्या ताफ्यांचा घेतला जाणार आढावा

**मुंबई :** मंत्री आणि अधिकाऱ्यांनी आगामी सर्व परदेश दौरे रद्द करावे, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. जे दौरे मंजूर झालेले आहेत ते दौरे ही रद्द करण्याचे आदेश देवेंद्र फडणवीस यांनी दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परदेश दौरे टाळा, असे आवाहन केले होते. नरेंद्र मोदींच्या या आवाहनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठा निर्णय घेतला आहे. आता विविध अभ्यासासाठी आणि कामासाठी परदेशात जाणारे मंत्री आणि अधिकारी यांचे दौरे रद्द करण्यात येणार आहेत.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अवाहनानंतर राज्यातील मंत्र्यांच्या ताफ्यांचा आढावा घेतला जाणार आहे. कोणत्या मंत्र्यांच्या ताफ्यात किती वाहनं? याचा आढावा घेण्यात येणार आहे. ज्या मंत्र्यांच्या ताफ्यात अधिकची वाहनं आहेत ती कमी केली जाणार आहेत. अनेक मंत्र्यांच्या ताफ्यात अधिकची वाहनं असण्याची शक्यता आहे. सामान्य प्रशासन विभाग आता ही मोहीम हाती घेणार आहे. मतदार संघात जाताना अनेक मंत्र्यांच्या ताफ्यात वाहनांची रांगच रांग लागलेली असते. आता ही वाहनांची रांग कमी होणार आहे. तर अनेक मंत्र्यांनी आता इलेक्ट्रीकल वाहन खरेदी करायला सुरुवात केली असून पेट्रोल-डिझेल जपून वापरण्याच आवाहन पंतप्रधान यांनी केल्यानंतर प्रशासनाचा मोठा निर्णय घेण्यात येत आहे.

### पर्यटनमंत्री शंभूराज देसाईंचा लंडन-पॅरिस दौरा रद्द

◆ पंतप्रधानांच्या या संदेशाला सकारात्मक प्रतिसाद देत महाराष्ट्राचे पर्यटन, खनिकर्म आणि माजी सैनिक कल्याणमंत्री, पालकमंत्री, सातारा जिल्हा शंभूराज देसाई यांनी आपल्या कुटुंबासोबत नियोजित असलेला युरोप दौरा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. सुमारे तीन महिन्यांपूर्वी ही कौटुंबिक परदेश सहल ठरविण्यात आली होती. या दौऱ्यात लंडन, पॅरिस आणि ॲम्स्टरडॅम या प्रमुख शहरांचा समावेश होता. राजकीय वर्तुळात या निर्णयाचे स्वागत होत असून 'देश प्रथम' या भूमिकेचे हे उदाहरण मानले जात आहे.

## राज्य सरकारने महागाई भत्ता वाढविला

♦ १ जानेवारीपासूनचा फरक मिळणार

प्रतिनिधी १३ मे

**मुंबई :** राज्य सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. महागाई भत्त्यात २ टक्क्यांची वाढ जाहीर करण्यात आली असून, त्यामुळे अधिकाऱ्यांचा आता ५८ टक्क्यांवरून थेट ६० टक्के झाला आहे. सामान्य प्रशासन विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला आहे. सरकारच्या आदेशानुसार ही वाढ १ जानेवारी २०२६ पासून लागू करण्यात आली आहे. त्यामुळे जानेवारीपासूनचा फरकही संबंधित अधिकाऱ्यांना मिळणार आहे. केंद्र सरकारच्या वित्त मंत्रालयाने जारी केलेल्या आदेशानंतर महाराष्ट्र शासनाने हा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे. या निर्णयाचा फायदा राज्य संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना होणार आहे. यामध्ये IAS, IPS आणि छ्इए अधिकाऱ्यांचा समावेश आहे. यापूर्वी या अधिकाऱ्यांना ५८ टक्के दराने महागाई भत्ता मिळत होता. आता ६० टक्के दर लागू झाल्याने त्यांच्या मासिक पगारात वाढ होणार आहे.


CLASSIFIED

पाहिजे

पार्ट टाईम अँड फुल टाईम जॉब करीता मुले पाहिजेत...!
१) मार्केटिंगसाठी ३ मुले (२ व्हिलर, आणि मोबाईल आवश्यक ) वेळ ९ ते ५
२) माल पोहचवायला २ मुले
-:संपर्क:-
आदिराज इंटरप्रासेस
प्लॉट नं. ५०७
नमुना गल्ली नं. ४
राजकमल चौक, अमरावती
मो. 7028286766



# परिचारिका आईचेच दुसरे रूप

**नर्स / परिचारिका हा शब्द ऐकताच, रूग्नाला बरे करण्यासाठी, औषधोपचार करणारी, पेशंटची काळजी घेणारी; असे चित्र चटकन डोळ्यासमोर उभे राहते. खर तर नर्सचा आनंदच हा असतो की आपला रूग्न ठणठणीत बरा झाला पाहीजे. नर्स म्हणजे निरनिराळ्या आव्हाणांचा सामना, जिथे हलगर्जीपणाला थारा नसतो, असेच एक आव्हान कोरोना महामारीचे या नर्सेस समोर उभे आहे. कोरोनाच्या या महाभयंकर परीस्थीती मध्ये आज नर्सेस आपल्या सेवेसाठी २४७७ कामासाठी तयार आहेत. महाभयंकर संकटाचा हा काळ मानव वंशालाच नष्ट करणारा आहे. काल परिचारिका दिन साजरा केला.**

या संकटावर मात करण्यासाठी जगातील सर्वच देश धडपड करीत आहे. मात्र अजुनही त्यावर पाहिजे तसे औषध उपलब्ध झालेले नाही. तरीसुध्दा कोरोना बाधीत रूग्न बरे होऊन आपल्या घरी परत आलेली दिसतात. त्याचे प्रमान असे की सतत मागील वर्षांपासून या संकटाच्या काळात आपल्या नर्सेस रात्रं-दिवस झटत आहे. स्वतःच्या जीवाची कुठलीही पर्वा नकरता, आपल्या जीवाचे रान करून, आपल्या रूग्नाला बरे करण्यासाठी मेहनत करीत आहेत. जशी आई आपले तान्हूले बाळ भुकेने व्याकुळ झालेले असतांना किंवा काहीतरी त्याचे दुखत असल्यास , रडत असल्यास त्याला शांत करण्यासाठी तीची धडपड, त्याला दुध पाजुन शांत करू की कोण्या वैद्याकडे घेऊन जाऊ; अशी अवस्था झालेली आई आपल्याला माहीतच आहे. बसं असाच अनुभव मला नर्सेसमधे पहावयास मिळत आहे. हो खरच मी आईची तुलना परिचारिकेसोबत करीत आहे. नर्स ही एक आईचेच दुसरे रूप आहे; असे मी म्हणेल.

जसे की- 'आई लंगड्याचा पाय असते, अंधळ्याचा डोळा असते'

तशीच- नर्स ही- 'रूग्नाच्या जीवनाचा आधार असते, मृत्युला वरदान असते'.


नर्स/परिचारिका ही दोन प्रकारच्या भुमीका बजावतांना दिसते; एक म्हणजे दवाखान्यातील रूग्नांना आईसारखे जोपासते तर, दुसरी म्हणजे तीच्या स्वतःच्या कुटुंबातील सदस्यत्वाची मार्मीक भुमीका. ज्या प्रकारे नर्स ही रूग्नांची सेवा करतांना तत्पर दिसते; तशीच तीला कुटुंबातील संवेदनशील भुमीका निभवावी लागते. कुटुंबातील सर्वच सदस्य पती, मुलं, सासु-सासरे, आई-वडील या सर्वांना ती आपल्या सर्व जबाबदाऱ्या समजुन सांभाळतांना दिसते.

'ए हिस्ट्री ऑफ नर्सींग' या पुस्तकात इटली मधील फ्लॉरेंस नाईटींगेल या नर्सचा जीवनपट वाचन्यास मिळतो. तीचा जन्म १८८० मध्ये इंग्रज घराण्यात झाला होता. तरून असतांना लग्नासाठी कित्येक मागण्या तिला होत्या परंतु तीने गोर-गरीबांच्या सेवेसाठी लग्नच केले नाही. आई-वडीलांना विरोध करून फ्लॉरेंसने जर्मनीतील 'कायसश्वर्थ ट्रेनिंग स्कुलमध्ये' नर्सींगचे ट्रेनींग घेतले. वयाच्या ३३ व्या वर्षी ती लंडनला महिला हॉस्पीटलमध्ये सुप्रिटंडैन्ट म्हणून काम केले. युध्दाच्या काळात तीला जखमी सैनिकांच्या उपचारासाठी एक वार्ड तयार करणायाचे आव्हान होते. ती स्वतः आणि एकूण ३८ नर्सेच्या मदतीने जीथे उंदरांचा सुळसुळात असलेल्या हॉस्पीटलला स्वच्छ करून, तीथे हात धुन्यासाठी साबना पासुन तर वॉश बेसीन, टॉवेल अशी सर्वच व्यवस्था केली. युध्दाचा काळ संपेपर्यंत त्यांनी येथे सैनीकांची सेवा केली. फ्लॉरेंसचा स्वभाव लहरी, ठाम मताची, शिघ्रकोपी आणि इतरांवर हक्क गाजवणारा होता. तर काही जन तिला तल्लख बुध्दीमत्ता असलेली; अशी ओळख तिची हीती. मृत्युआधी कात्तेक वर्षे ती अंथरूनाला खिळून होती. पण आशा अवस्थेतही ती पुस्तके आणि पत्रीका लीहीत होती. शेवटी सन १९१० मध्ये तीचा मृत्यु झाला. म्हणजेच आपण ठामपणे सांगु शकतो की संपुर्ण आयुष्य तीने एका आईप्रमाणे सैनीकांची व रूग्नांची सेवा करण्यासाठी समर्पीत कले. यांच्या जयंती निमीत्तच आपण १२ मे हा दिवस जागतीक परिचारिका दिन म्हणुन साजरा करीत आसतो.

प्रा. प्रज्ञानंद श्रीकृष्ण थोरात
रा. खडकी, अकोला
मो. ९७२२६७४४८७

# मलेरियाच्या जंतूचा शोध लावणारे थोर शास्त्रज्ञ सर रोनाल्ड रॉस!

## आज जयंती



सर रोनाल्ड रॉस हे एक ब्रिटिश वंशीय डॉक्टर आणि शास्त्रज्ञ होते, ज्यांचा जन्म भारतात झाला. त्यांनी मलेरिया (हिवताप) हा रोग डासांमुळे पसरतो, हा अत्यंत महत्त्वाचा शोध लावला. रोनाल्ड रॉस यांचा जन्म १३ मे १८५७ रोजी उत्तराखंडमधील अल्मोरा येथे झाला. त्यांचे वडील ब्रिटिश सैन्यात अधिकारी होते. त्यांचे सुरुवातीचे शिक्षण इंग्लंडमध्ये झाले आणि १८७५ मध्ये त्यांनी लंडनच्या सेंट बार्थोलोम्यू हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय शिक्षण घेतले. १८८१ मध्ये डॉक्टर झाल्यावर ते 'इंडियन मेडिकल सर्व्हिस'मध्ये रुजू झाले आणि भारतात परतले. त्यांनी सिकंदराबाद, हैदराबाद आणि कलकत्ता येथे मलेरियावर संशोधन केले. ऑगस्ट १८९७ मध्ये, त्यांनी ॲनोफिलीस डासांच्या जठरात मलेरियाचे परजीवी शोधून काढले. त्यांनी हे सिद्ध केले की मलेरियाचा प्रसार डासांच्या चावण्यामुळे होतो. त्यांच्या या क्रांतिकारी शोधासाठी, त्यांना १९०२ मध्ये शरीरविज्ञान किंवा वैद्यकशास्त्रातील प्रतिष्ठित नोबेल पारितोषिक देण्यात आले. १९११ मध्ये त्यांना 'नाइट' किताब देऊन सन्मानित करण्यात आले. सर रोनाल्ड रॉस यांचा शोध जगभरातील कोट्यवधी लोकांचे प्राण वाचवण्यासाठी मैलाचा दगड ठरला आहे.

रॉस यांचा जन्म भारतातील अलमोडा येथे झाला. त्यांचे वडील सैन्यामध्ये अधिकारी होते. वयाच्या आठव्या वर्षापासून शिक्षणाकरिता त्यांना इंग्लंडमध्ये पाठविण्यात आले. १८७४-७९ या काळात लंडन येथील सेंट बार्थोलोम्यू हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय शिक्षण घेतल्यावर त्यांनी पुढील दोन वर्षे जहाजावरील वैद्य म्हणून नोकरी करून बराच सागरी प्रवास केला. १८८१ मध्ये ते भारतातील वैद्यकीय सेवेत नोकरीस लागले. १८८९ मध्ये इंग्लंडमध्ये रजेवर गेले असताना त्यांनी सार्वजनिक आरोग्याची पदविका मिळविली व नव्यानेच प्रस्थापित झालेल्या सूक्ष्मजंतूविज्ञानाच्या अभ्यासक्रमास उपस्थित राहिले. १८९२ पासून त्यांनी हिवतापाच्या अभ्यासात लक्ष घातले. १८९४ मध्ये त्यांचा ॲसर पॅट्रिक मॅन्सन यांच्या प्रोत्साहनाने आणि मार्गदर्शनाखाली रॉस यांच्या हिवतापावरील संशोधनात भर पडली. मॅन्सन यांनी हिवतापासंबंधी पुढील दोन प्रमुख गोष्टी रॉस यांच्या नजरेस आणल्या : (१) हिवतापाच्या रुग्णाच्या रक्तामध्ये सी. एल्. ए. लाव्हरा यांनी शोधून काढलेले काळे रंगद्रव्य परजीवी असतात आणि (२) डास हिवतापाचे रोगवाहक आहेत हा मॅन्सन यांचा स्वतःचा सिद्धांत याशिवाय रॉस भारतात परतल्यानंतरही दोघांचा सतत पत्रव्यवहार चालूच होता.

रॉस यांच्या पुढे दोन मुख्य प्रश्न होते : (१) डासांच्या अनेक प्रकारांपैकी कोणता प्रकार रोगवाहक आहे? आणि (२) असंख्य परजीवींपैकी नेमका कोणता रोगोत्पादक आहे? यांपैकी २० ऑगस्ट १८९७ रोजी त्यांना ॲनॉफेलीस डास हे रोगवाहक असल्याचे आढळले. त्यानंतर काही बंदिस्त पक्ष्यांवर त्यांनी प्रयोग केले व रोगी पक्ष्यांमधील रोग डासांच्या चाव्यामुळे सरळ निरोगी पक्ष्यांत फैलावतो हे दाखविले. त्यांनी पक्ष्यांच्या हिवतापाशी संबंधित असलेल्या डासामधील परजीवीच्या जीवनचक्राचाही शोध लावला. १८९८ मध्ये मॅन्सन यांनी रॉस यांच्या कार्याचा वृत्तांत ब्रिटिश मेडिकल असोसिएशनच्या एडिंबरो येथील बैठकीत मांडला. त्याच वर्षाच्या अखेरीस जी. बी. ग्रास्सी यांनी आणि त्यांचे इटालियन सहकारी यांनी मानवी हिवतापाच्या परजीवीचे ॲनॉफेलीस डासातील जीवनचक्र असेच असते हे दाखविले. या कार्याच्या श्रेयासंबंधी निर्माण झालेला कटू वाद पुढे रॉस यांना नोबेल पारितोषिक मिळाल्यावर बराचसा थांबला.

रॉस यांनी १८९९ मध्ये नोकरीचा राजिनामा दिला व ते इंग्लंडमध्ये राहावयास गेले. लिव्हरपूल स्कूल ऑफ ट्रॉपिकल मेडिसीन या संस्थेत १९१२ पर्यंत काम केल्यानंतर त्यांनी लंडन येथे वैद्यकीय सल्लागर म्हणून व्यवसायास सुरुवात केली. या काळात डासांच्या नियंत्रणाच्या समस्येवर त्यांनी बराच वेळ खर्च केला व अनेक उष्ण कटिबंधीय देशांना याबाबत सल्ला दिला.

रॉस यांना प्रारंभीच्या काळात साहित्याची (विशेषतः कविता व नाट्य लेखनाची) अतिशय आवड होती आणि १८८३-१९२० या काळात त्यांचे साहित्यविषयक १५ ग्रंथ प्रसिद्ध झाले. यांशिवाय त्यांना गणिताचीही आवड होती व या विषयावरही त्यांची ७ पुस्तके १९०१-२१ या काळात प्रसिद्ध झाली. हिवतापाच्या प्रतिबंधासाठी सार्वजनिक आरोग्य कार्यक्रम आखण्याच्या दृष्टीने त्यांनी कित्येक ग्रंथ, पुस्तिका इ. लिहिल्या. मॉस्किटो थ्रिगेडस अँड हाऊ टू ऑर्गनाइझ देम (१९०२) व द प्रिव्हेन्शन ऑफ मलेरिया (१९१०) हे त्यांचे ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहेत. सायन्स प्रोग्रेस व ॲनल्स ऑफ ट्रॉपिकल मेडिसीन या नियतकालिकांचे ते संपादक होते. इ. स. १९०१ मध्ये त्यांची रॉयल सोसायटीचे सदस्य म्हणून निवड झाली. पहिल्या महायुद्धात त्यांनी शाही लष्करी वैद्यकीय दलात काम केले. ९१११ मध्ये के. सी. वी. व १९१८ मध्ये के. सी. एन्. जी. हे सन्मान त्यांना मिळाले. त्यांचा १६ सप्टेंबर १९३२ मध्ये लंडन येथे मृत्यू झाला.




# अधिक मासातील अधिक आकर्षक आकाश

**अकोला :** जून अधिक महिना असुन या कालावधीत आकाशात विविध प्रकारच्या घडामोडींचा आनंद घेण्याचे आवाहन विश्वभारती केंद्राचे प्रमुख प्रभाकर दोड यांनी केले आहे.

अधिक महिना हा सौर व चांद्र मासातील ताळमेळ बसण्यासाठी सुमारे दर पावणे तीन वर्षांनी येतो. चांद्र वर्ष ३५४ दिवसांचे तर सौर वर्षात ३६५ दिवस येतात.दरवर्षी पडणारा ११ दिवसांचा फरक भरुन काढल्याने बहूतांशी सणांतील वेळेतील मेळ साधल्या जातो.ज्या चांद्र महिन्यात सूर्याचा राशी बदल होत नाही तो महिना अधिक असतो.या वर्षी मे -जून मधील ज्येष्ठ तर पुढील अधिक महिना २०२९ मध्ये मार्च आणि २०३१ मध्ये ऑगस्ट मध्ये येईल.

**पाच ग्रह दर्शनाला सज्ज**

सध्या पश्चिमेला तेजस्वी शूक्र आणि सर्वात मोठा गुरु ग्रह रोज एकमेकांच्या जवळ येताना खूप सुंदर दिसतील.यात दि.२३ मे पासून बुध ग्रह सामील होईल.शनी आणि मंगळ पहाटे दिसत आहेत. याच कालावधीत विदर्भात दक्षिणोत्तर अक्षवृत्तीय स्थितीनुसार क्रमाने सूर्य नेमका डोक्यावर आल्याने माध्यान्ह वेळी शून्य सावली अनुभवता येईल. दि.१८, २९, ३० मे व १ व १४ जूनला स्पेस स्टेशन, दि.१९ व २० मे रोजी चंद्र शूक्र आणि गुरु ग्रहाचे जवळ असेल.२३ मे ला चंद्र मघा ,दि.२७ ला चित्रा जवळ आणि ३१ ला महिन्यातील दुसऱ्या पौर्णिमेला ज्येष्ठ तारका चंद्रा आड येईल.

**१ जूनला गुरु कर्क राशीत :** ८ जून रोजी सूर्य मृग नक्षत्रात येईल.९ ला पर्सिड उल्का वर्षाव तर १० जूनला शूक्र व गुरु अगदी जवळ येतील, आपणही सारे एकत्र येऊन आकाशातील हे मनोहारी नजारे आपल्या डोळ्यात साठवून अधिक महिन्यातील दिवसा उन सावली तर रात्री ग्रह ताऱ्यांच्या सोबत अधिक आनंद घेऊ या.

**CHANGE IN NAME**

WANT TO CHANGE FATHER NAME FROM **MOHAMMAD MUSAVVIR MOHAMMAD SADIQUE** TO **MOHAMMAD MUSAVVIR MOHAMMAD SADIK**

**-: ADDRESS: -**
**RAHEMAT NAGAR, JUNI BASTI, MURTIZAPUR DIST. AKOLA**

CNR No.: MHAK06-00-2026 प्रोसेस क्र. 1656/2026 दिनांक: 12/05/2026

**जाहीर नोटीस**

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी. क्र. १४८/२०२६** **चौकशी तारीख: ३०/०६/२०२६**

अर्जदार : १. श्रीमती प्रमिला प्रभुदास तोटे, वय– ५२, धंदा – घरकाम
२. परमेश्वर प्रभुदास तोट, वय – ३०, धंदा – शेती,
३. सौ. गंगाबाई मुनीराम चिलात्रे, वय – २६, धंदा – घरकाम
सर्व रा. मु. रूधाडी, पोस्ट. पोपटखेड, ता.अकोट जि. अकोला.

.......... विरूध्द ............

गैरअर्जदार : कोणीही नाही.

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन VIII १८२७ चे कलम २ अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट, जिल्हा अकोला यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे.

अर्जदार हे वरील ठिकाणचे रहिवासी असुन अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ व ३ चे वडील नामे प्रभुदास जयराम तोटे हे आपले संपुर्ण जिवनकाळात मौजे. रूधाडी पोस्ट. पोपटखेड, ता. अकोट जि.अकोला. येथेच राहले व तेथेच दि.१०/०२/२००५ रोजी मयत झाले आहेत. तसेच प्रभुदास जयराम तोटे यांची आई नामे सोनाय जयराम तोटे हया दि.१२/०५/२०१९ रोजी मौजे. रूधाडी पोस्ट. पोपटखेड, ता. अकोट जि.अकोला येथे मयत झाल्या आहेत. मयत प्रभुदास जयराम तोटे व यांना अर्जदार क्र. १ ते ३ यांचे व्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जासंबंधी इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा ते स्वत: वारस असल्यास, सदरची नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाचे आंत, त्यांनी उपरोक्त न्यायायालयात स्वत: अथवा वकीलामार्फत हजर राहावे अन्यथा सदरचे प्रकरण नियमानूसार निकाली काढण्यात येईल.

करीता आज दिनांक:१२/०५/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशानूसार,

शिक्का

सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय (व.स्तर), अकोट,
जि.अकोला.



# संमिश्र

# छावा तर्फे उद्या संभाजी राजे जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक



प्रतिनिधी १३ मे

**अकोला :** १४ मे २०२६ रोजी छावा संघटनेतर्फे छत्रपती संभाजी राजे जयंती निमित्त भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. याबाबत पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक छावाचे जिल्हाप्रमुख शंकरराव वाकोडे यांचे अध्यक्षतेखाली जि. प. कर्मचारी कल्याण भवनात झाली.

१४ मे रोजी सायंकाळी ५ वाजता स्थानिक शिवाजी पार्क येथून या मिरवणुकीचा प्रारंभ होईल. या मिरवणुकीत हजारो युवक व विविध देखाव्यांचा तसेच आखाड्यांच्या चित्त थरारक प्रात्यक्षिकांचा सहभाग राहणार आहे. सर्व बाबींचा आढावा घेण्यात आला. १४ रोजी सायंकाळी प्रमुख अतिथींच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे पूजन झाल्यानंतर मिरवणुकीस प्रारंभ होईल. याप्रसंगी छावाचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख प्रदीप खाडे, अरविंद कपले, सुनील जानोरकर, संजय लुंगे, विजय बोरकर, मनोहर मांगटे पाटील, अनिरुद्ध भाजीपाले, चेतन लोखंडे, श्याम कुलट, रजनीश ठाकरे, ज्ञानेश्वर मांडेकर, दामोदर पाथरीकर, गणेश पारस्कर, संघर्ष सावरकर, गोपाल सुरे, सुनील माणिकराव, देवेंद्र वाघमारे, शंकर डाबेराव, प्रशांत शेवतकर, सय्यद परवेज, महेंद्र काळे, ओम देशमुख, अमोल आगे, अमर भागवत, विष्णू झांबरे, मनोज इंगळे, प्रमोद उपाध्ये, सचिन भोयर, योगीराज गावंडे आदींसह इतरही पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# ज्ञानेश्वर महाराज वाघ यांच्या सुवर्ण महोत्सवाचे आयोजन



**अकोट :** श्री ज्ञान भास्कर सेवा संस्थान हिंगणी खुर्द द्वारा श्रीसंत वासुदेवजी महाराज स्मृती मंदिर श्री ज्ञानेश आश्रम वारी भैरवगढच्या वतीन २१ मे पर्यंत चालू असलेल्या श्री माऊली सर्वांगीण विकास बालसंस्कार शिबिरामध्ये पुरुषोत्तम मास येत आहे. अधिक ज्येष्ठ प्रतिपदा १७ ते २१ मे पर्यंत पंचदिवशीय कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

२० मे ला ज्ञानेश आश्रम ते वारी हनुमान पर्यंत शिबिरार्थींची भव्य शोभायात्रा, दुपारी चक्री प्रवचन व रात्रौ बाल कीर्तनकाराचे कीर्तन होऊन , २१ मे ला गुरुपुष्यामृताच्या पर्वकाळावर संस्थेच्या सर्व आजी-माजी विद्यार्थ्यांनी संतश्री वासुदेवजी महाराजांचे कृपांकित ' संस्कार रत्न 'भागवताचार्य श्री ज्ञानेश्वर महाराज वाघ यांचा सुवर्ण महोत्सव करण्याचे ठरविले आहे. हा त्रिवेणी संगमाचा योग घडून येत आहे,' अधिकस्य अधिकं फलम् ' या न्यायाने ' देशे कालेच पात्रेच तद्दानं सात्त्विकं स्मृतम् ' हा गीतोक्त भगवदादेश तसेच ' तरी या सुयोग्य देश, काल, पात्रांच्या प्रयागावर त्रिवेणी संगमावर ' धनाढ्य निर्दोष दानतीर्थी' या नियमाने शिबिरार्थी विद्यार्थी, विद्यार्थिनी व सामूहिक पारायणकर्त्यांच्या अन्नदानाकरिता तसेच महाराजश्रींच्या सुवर्ण महोत्सव दिनी यांच्या ग्रंथ , पंचधान्य ,व नाणेतुला करण्यात येणार आहे असे ज्ञानेश्वर महाराज भालतिलक कळवितात.

CNR No.: MHAK06-00-2026 प्रोसेस क्र. 1652/2026 दिनांक: 12/05/2026

**जाहीर नोटीस**

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी. क्र. १४२/२०२६** **चौकशी तारीख: ३०/०६/२०२६**

अर्जदार : १. श्रीमती सरस्वती मनोहर कासदे, वय– ५५, धंदा – घरकाम
२. श्याम मनोहर कासदे, वय – ३४, धंदा – शेती,
३. मंगेश मनोहर कासदे, वय – २६, धंदा – शेती,
४. सौ. सविता दिनेश हरदे, वय – ३६, धंदा – घरकाम
सर्व रा. मु. रूधाडी, पोस्ट. पोपटखेड, ता.अकोट जि. अकोला.

.......... विरूध्द ............

गैरअर्जदार : कोणीही नाही.

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन VIII १८२७ चे कलम २ अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट, जिल्हा अकोला यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे.

अर्जदार हे वरील ठिकाणचे रहिवासी असुन अर्जदार क्र.१चे पती व अर्जदार क्र. २ ते ४ चे वडील नामे मनोहर मोतीराम कासदे हे आपले संपुर्ण जिवनकाळात मौजे. रूधाडी पोस्ट. पोपटखेड, ता. अकोट जि.अकोला. येथेच राहले व तेथेच दि.०७/११/२०१७ रोजी मयत झाले आहेत. तसेच मयत मनोहर मोतीराम कासदे यांची आई नामे जयवंतीबाई मोतीराम कासदे हया २५ वर्षापुर्वी मयत झाल्या आहेत. मयत मनोहर मोतीराम कासदे यांना अर्जदार क्र. १ ते ४ यांचे व्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जासंबंधी इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा ते स्वत: वारस असल्यास, सदरची नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाचे आंत, त्यांनी उपरोक्त न्यायायालयात स्वत: अथवा वकीलामार्फत हजर राहावे अन्यथा सदरचे प्रकरण नियमानूसार निकाली काढण्यात येईल.

करीता आज दिनांक:१२/०५/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशानुसार,

शिक्का

सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय (व.स्तर), अकोट,
जि.अकोला.

# सापडलेले २० हजार पोलिसांकडे जमा केले प्रामाणिकपणा शिल्लक असल्याचे दिसून आले



**मूर्तिजापूर :** शहरातील एचडीएफसी बँकेतून दुपारी स्टेशन विभागातील सचिन मालानी यांनी बँकेतून २० हजार असे पाच वेळा एटीएम मधून काढून रक्कम खिश्यात ठेवून आपल्या गाडीने परत घराकडे येत असता खिशातून एक गड्डी पडली. श्याम जोशी व अंकुश अग्रवाल हे दुचाकीने येत असता त्यांना बँकेपुढे काही अंतरावर रस्त्यावर रक्कम पडलेली दिसली. त्यांनी रक्कम सिटी पोलिस ठाण्यात जमा केली. त्यांनी सिटी पोलिस ठाण्यात जमा करण्याकरीता नेली असल्याची माहिती मिळताच तेथे अंकुश अग्रवाल व शाम जोशी हे रक्कम मोजून ठाण्यात जमा करीत होते. पोलिसांनी शहानिशा करून पोलिस निरीक्षक अजित जाधव, एएसआय मुन्ना पांडे यांच्या समक्ष रक्कम सचिन मालानी यास परत दिली. सगळ्यांचे आभार मानले.

# सेंट पॉल्स अकॅडमी मध्ये गुणवंत विद्यार्थी व पालकांचा सत्कार

**अकोट :** सेंट पॉल्स अकॅडमी येथे ११ मे रोजी इयत्ता १२ वी व १० वी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष नवनीत लखोटिया, प्रमुख पाहुणे संस्थेचे सचिव प्रमोद चांडक ,संस्थेचे उपाध्यक्ष लुणकरण डागा,रिता गुप्ता, शाळेचे मुख्याध्यापक विजय बिहाडे, उपमुख्याध्यापिका ममता श्रावगी ,रिंकू अग्रवाल ,प्रभुदास नाथे, पर्यवेक्षक अभिजीत मेंढे, निलिमा देशमुख यांची उपस्थिती लाभली.

अकोट तालुक्यातील एच. एस. सी व एस .एस .सी. बोर्डाच्या परीक्षेच्या निकालात दरवर्षीप्रमाणे सेंट पॉल्स अकॅडमी




अकोट ने १००% निकालाची परंपरा या वर्षी सुद्धा कायम ठेवली. १२ वी व १० वी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच त्यांच्या पालकांचा व्यवस्थापकांनी तसेच मुख्याध्यापक व उपमुख्याध्यापिका यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यामध्ये इ १२ वी मधून ऋतुजा काळे, अधिरथ ठाकरे, कृष्णाली कोकाटे, किशोर सावांग, वंश गुप्ता यांनी प्रथम पाच मध्ये क्रमांक पटकावला .तर इ १० वी मधून पहिले पाच क्रमांक जाई तायडे, आनंदी बन्नावडे, श्रद्धा मेंढे, लकी चोटमल, अर्णवी भाजीपाले, समृद्धी हुतके यांना मिळाला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले व त्यांनी आपल्या भाषणातून त्यांच्या यशाचे श्रेय व्यवस्थापक मंडळ, शिक्षक वृंद व आई वडील यांना दिले. तसेच दिपाली हुतके या पालकांनी विद्यार्थ्यांचा विकास हा शाळेच्या घेतलेल्या परिश्रमामुळे झाला असे सांगितले. त्यानंतर शाळेचे अध्यक्ष नवनीत

लखोटिया आपल्या भाषणातून गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. व शाळेचे मुख्याध्यापक विजयजी बिहाडे यांनी सुद्धा गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

CNR No.: MHAK06-00-2026 प्रोसेस क्र. 1651/2026 दिनांक: 12/05/2026

**जाहीर नोटीस**

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी. क्र. १४६/२०२६** **चौकशी तारीख: ३०/०६/२०२६**

अर्जदार : १. किशोर काशीराम कासदे, वय– ४०, धंदा – मजुरी
२. राजेश काशिराम कासदे, वय – ३५, धंदा – मजुरी,
३. दिपक काशिराम कासदे, वय – ३१, धंदा – मजुरी,
४. सौ. अनिता बन्सीलाल बेलसरे, वय – ३३, धंदा – घरकाम
५. सौ. प्रमिला सुनिल तोटे, वय – ३०, धंदा – घरकाम
सर्व रा. मु. रूधाडी, पोस्ट. पोपटखेड, ता.अकोट जि. अकोला.

.......... विरूध्द ............

गैरअर्जदार : कोणीही नाही.

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन VIII १८२७ चे कलम २ अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट, जिल्हा अकोला यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे.

अर्जदार हे वरील ठिकाणचे रहिवासी असुन अर्जदार क्र. १ ते ५ चे वडील नामे काशिराम मोतीराम कासदे हे आपले संपुर्ण जिवनकाळात मौजे. रूधाडी पोस्ट. पोपटखेड, ता. अकोट जि. अकोला. येथेच राहले व तेथेच दि.२३/०९/२०२३ रोजी मयत झाले आहेत. तसेच अर्जदार क्र. १ ते ५ यांची आई व मयत काशिराम मोतीराम कासदे यांची पत्नी नामे पुर्णाबाई काशिराम कासदे हया दि. २८/१०/२०१८ रोजी मौजे. रूधाडी पोस्ट. पोपटखेड, ता. अकोट जि.अकोला येथे मयत झाल्या आहेत. तसेच मयत काशिराम मोतीराम कासदे यांची आई नामे जयवंतीबाई मोतीराम कासदे हया बरेच वर्षापुर्वी मयत झाल्या आहेत. मयत काशिराम मोतीराम कासदे व मयत पुर्णाबाई काशिराम कासदे यांना अर्जदार क्र. १ ते ५ यांचे व्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जासंबंधी इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा ते स्वत: वारस असल्यास, सदरची नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाचे आंत, त्यांनी उपरोक्त न्यायायालयात स्वत: अथवा वकीलामार्फत हजर राहावे अन्यथा सदरचे प्रकरण नियमानूसार निकाली काढण्यात येईल.

करीता आज दिनांक:१२/०५/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशानुसार,

शिक्का

सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय (व.स्तर), अकोट,
जि.अकोला.

सिटी न्यूज अकोला
बुधवार, दि.१३ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# गावरान आंब्यांना ग्राहकांची मागणी

**अकोला :** शहरात नेहरू पार्क ते रस्त्याच्या कडेला ग्रामीण भागातील गावरान आंबे विक्रीसाठी ठेवण्यात आले आहेत. पारंपरिक पद्धतीने पिकवलेल्या या आंब्यांना नैसर्गिक चव आणि सुगंध लाभला आहे. याच वेगळ्या चवीमुळे ग्राहकांची या आंब्यांकडे विशेष ओढ दिसून येत आहे. उन्हाळ्याच्या हंगामात गावरान आंब्यांची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे.

विक्रेतेही ताजे व दर्जेदार आंबे ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहेत. गावरान चवीचा आस्वाद घेण्यासाठी नागरिक मोठ्या उत्साहाने खरेदी करताना दिसत आहेत. गावरान आंब्यांची लज्जत काही वेगळीच असते त्यामुळे ग्राहकांचा गावरान आंबे खरेदी करण्याकडे कल दिसून येतो. अकोला बाजारात गावरान आंबे मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे.

# सातपुड्याच्या काळजात पोहोचली माणुसकीची ‘दखल’

## मुद्रक संघाने उजळल्या मेळघाटातील शेकडो झोपड्या

प्रतिनिधी १३ मे







**अकोला :** ‘इथे रस्ता नाही, वीज नाही, पण आज तुमच्या येण्याने आमच्या झोपडीत दिवाळी आली बाप्पा...’ खोंगडा गावातील ८० वर्षीय निराधार आजीच्या डोळ्यातील अश्रूंनी ‘दखल’ आणि अकोला जिल्हा मुद्रक संघाच्या १५ वर्षांच्या अखंड सेवेची पावती दिली.

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून दर १ मे रोजी मेळघाटातील आदिवासी बांधवांच्या दारापर्यंत मायेचा हात पोहोचवण्याचा वसा या दोन संस्थांनी घेतला आहे. यंदा १० मे रोजी हा सेवायज्ञ सातपुड्याच्या अत्यंत दुर्गम, डोंगर-दऱ्यांमध्ये वसलेल्या ङखोंगडा, गिरगुटी व अढावङ या गावांमध्ये संपन्न झाला. जिथे पावसाळ्यात ४ महिने जगाचा संपर्क तुटतो, तिथे ‘दखल’च्या कार्यकर्त्यांनी पायपीट करत जीवनावश्यक वस्तू पोहोचवल्या.

अकोला जिल्हा मुद्रक संघाचे अध्यक्ष प्रदिप गुरुखुद्दे यांच्या संवेदनशील मार्गदर्शनाखाली हा उपक्रम केवळ ‘वाटप’ न राहता ‘आपुलकीचा संवाद’ ठरला. कुपोषणाने ग्रासलेल्या चिमुकल्यांच्या हातात जेव्हा प्रोटीन पावडरचे डबे पडले, तेव्हा त्यांच्या आयांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान पाहून उपस्थितांचेही काळीज हेलावले. शाळेत जाण्यासाठी चप्पल नसलेल्या पायांना जेव्हा नवीन चप्पल मिळाली, तेव्हा त्या निरागस चेहऱ्यांवर उमललेलं हसू - हीच या १५ वर्षांच्या तपस्येची खरी कमाई होती.

## काय वाटले? तर माणुसकी वाटली...

यावेळी जवळपास १५०० कपडे वाटण्यात आले. फक्त कपडे नव्हते, तर ती होती माया. मध्यमवयीन कष्टकरी बांधवांसाठी पॅन्ट-शर्ट, कुर्ता-पायजमा; आयुष्याच्या संध्याकाळी आधार हरवलेल्या वयोवृद्ध माऊलींसाठी साडी-चोळी; आणि शिक्षणाची आस असलेल्या कोवळ्या हातांसाठी कंपास, टिफिन, वही, लेटरबुक. एका पिशवीतून फक्त वस्तू नाही, तर ‘तुम्ही एकटे नाहीत, आम्ही आहोत’ हा विश्वास प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचला. या उपक्रमाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ङअकोला जिल्हा मुद्रक संघाचा एकही सदस्य एक रुपयाचीही वर्गणी गोळा करत नाही. अध्यक्षांपासून कार्यकारी सदस्यांपर्यंत सर्वजण आपापल्या खिशातून, आपल्या घामाचा पैसा खर्च करून ही सेवा करतात. ‘देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे, घेता घेता देणाऱ्याचे हात घ्यावेत’ या उक्तीला जागणारी ही माणसं आहेत. या पवित्र कार्यात कार्यकारी सदस्य दत्ता ठाकरे, सहसचिव संतोष धरमकार, आरिफ भाई खान, संदीप मोरे, अमोल खोंड, महेश देशमुख, संजय देशमुख, दिलीप हांडे यांनी खांद्याला खांदा लावून काम केले. मारुतीच्या अधिकृत डिलर ङखंडेलवाल ऑटोव्हील्सच्या संचालिका शारदा वसंत खंडेलवालङ यांनी देखील मातृभावने या कार्याला हातभार लावला.



# अडगांव बु. येथील महसूल कार्यालय गावाबाहेर नेण्यास ग्रामस्थांचा तीव्र विरोध

प्रतिनिधी १३ मे

**अडगांव बु. :** येथील महसूल कार्यालय गावाबाहेर हलवण्याच्या हालचालींना वेग आला असून, प्रत्यक्ष बांधकामालाही सुरुवात झाली आहे. प्रशासनाच्या या निर्णयामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, स्थानिक पुढाऱ्यांनी घेतलेल्या मौनामुळे नागरिकांनी स्वतःच याविरोधात रण फुंकले आहे.

गावाच्या हृदयस्थानी असलेल्या महसूल विभागाची स्वतःची हक्काची आणि प्रशस्त जागा उपलब्ध आहे. मात्र, ही जागा अपुरी असल्याचे कारण पुढे करत महसुल प्रशासनाने गावाबाहेरील एका 'ओपन स्पेस' ची ग्रामपंचायत कडे मागणी करुण त्यामधे नवीन इमारतीचे बांधकाम सुध्दा सुरू केले आहे नाल्याच्या काठी कुचाड्यात ही जागा कोणाच्या फायद्यासाठी निवडली गेली, असा सवाल आता जनतेच्या मनात उपस्थित होत आहे. कार्यालय गावाबाहेर गेल्यास ज्येष्ठ नागरिक, शेतकरी आणि महिलांना नाहक पायपीट करावी लागेल. यापूर्वीच सेंट्रल बँक आणि पशुवैद्यकीय दवाखाना, पोलीस चौकी, गावाबाहेर गेल्याने मुख्य बाजारपेठेतील वर्दळ कमी झाली आहे. आता महसूल कार्यालयही गेल्यास छोट्या व्यावसायिकांच्या रोजगारावर गदा येईल. या प्रकरणी गांवकऱ्यांनी निवेदन महसुल प्रशासनासह, ग्रामपंचायत कार्यालय, खा.अनुप धोत्रे, आणि संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले आहे.

# आर्ट ऑफ लिविंगचा ‘अनसंग एव्हरीडे हिरो’ पुरस्कार वितरण सोहळा संपन्न




प्रतिनिधी १३ मे

**अकोला:** अकोला. मानवी सेवेमध्ये जगभरात सक्रिय असलेले पूज्य गुरुदेव श्री श्री रविशंकरजी यांच्या आर्ट ऑफ लिविंग संस्थेचा ४५ वा स्थापना दिवस आणि पूज्य गुरुदेवांच्या ७० व्या जन्मोत्सवाचे औचित्य साधून अकोला शहरात 'अनसंग एव्हरीडे हिरोज' पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. समाजातील निस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या प्रेरणादायी व्यक्ती आणि संस्थांचा सन्मान करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. स्थानिक आर.एल.टी. कॉलेजमध्ये पार पडलेल्या या सोहळ्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सुहासिनी संजय धोत्रे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अकोलाचे सचिव दीनानाथ दाभाडे आणि डॉ. हेडगेवार हॉस्पिटल व संशोधन केंद्र अकोलाचे अध्यक्ष नरेंद्र ऊर्फ बाबासाहेब पाठक उपस्थित होते.

कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील मान्यवरांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले. ज्येष्ठ समाजसेवक गोपाळ शंकरलाल खंडेलवाल यांना त्यांच्या संपूर्ण आयुष्यातील निस्वार्थ, समर्पित आणि अपेक्षारहित सेवा कार्यासाठी प्रदान करण्यात आला.

काजल प्रकाश राजवैद्य यांना नवोपक्रम आणि रोबोट तंत्रज्ञान क्षेत्रात भारत तसेच परदेशातील उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत बॉक्सिंग क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवल्याबद्दल कु. भक्ती रवींद्रसिंह चुंगडे हिचा गौरव करण्यात आला.

एकविरा मल्टिपर्पज फाउंडेशनला कर्णबधिर मुलांच्या श्रवण आणि वाणी पुनर्वसनासाठी करत असलेल्या सामाजिक कार्याबद्दल प्रदान करण्यात आला. मानव सेवा फाउंडेशनच्या माध्यमातून निराश्रित, मानसिक आजारी व्यक्ती, अनाथ मुले आणि परित्यक्तांच्या पुनर्वसनासाठी कार्य करणाऱ्या अमोल कैलास घोडे यांना हा पुरस्कार देण्यात आला.

पर्यावरण संरक्षण, युवा सक्षमीकरण आणि सामुदायिक विकासासाठी सुचित अविनाश चव्हाण यांना सन्मानित करण्यात आले. मन नदी पुनरुज्जीवन अभियान, जलसंधारण आणि १४ गावांच्या भूजल पुनर्भरण कार्यासाठी सचिन वामनराव कुलकर्णी यांना गौरविण्यात आले. या प्रसंगी आर्ट ऑफ लिविंगच्या महाराष्ट्र राज्य अपेक्स बॉडीचे सदस्य कपिल ठक्कर यांनी पश्चिम विदर्भातील सामाजिक प्रकल्पांची माहिती दिली. 'प्रोजेक्ट भारत'चे राज्य समन्वयक मनोज इंगोले यांनी या अभियानाचे सामाजिक महत्त्व स्पष्ट केले. जिल्हा शिक्षक समन्वयक आरती देशपांडे यांनी शहरात १५ ते १७ मे दरम्यान आयोजित 'आनंद उत्सव' कार्यक्रमाची माहिती देऊन जास्तीत जास्त नागरिकांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

# हिवरखेड सोसायटीच्या अध्यक्षपदी राजनकार तर उपाध्यक्षपदी गावंडे



प्रतिनिधी १३ मे

**हिवरखेड :** येथील सेवा सहकारी सोसायटीच्या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचे पुरुषोत्तम देवीदास राजनकार यांची अध्यक्षपदी तर भारतीय जनता पक्षाचे रामदास गावंडे उपाध्यक्षपदी अविरोध निवड करण्यात आली. शेतकरी प्रगती पॅनल चे रमेश दुतोंडे, जमीर पठाण, राजेंद्र भोपळे, डॉ राम तिडके, डॉ प्रशांत इंगळे, श्याम भोपळे, नगर परिषद सभापती वैभव गावंडे, माजी सरपंच संदीप इंगळे, प्रकाश खोब्रागडे ,मनीषजी भुडके, महेंद्र भोपळे, मिलिंद भोपळे ,शांताराम कवळकार, मनोहर ताळे ,राजूभाई बहोद्दिन यांच्यासह सेवा सहकारी सोसायटीचे सदस्य तथा पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# अकोट तालुक्यामधून प्रथम क्रमांक पटकावून पूर्वा लांडेची गगन भरारी

प्रतिनिधी १३ मे



**अकोट :** दहावी परीक्षेत विद्यार्थ्यांनी अकोलखेड नगरीच्या शिरपेचात मनाचा तुरा रोवला आहे. गावातून चाळीस पेक्षा जास्त विद्यार्थी इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेण्याकरिता अकोटला येतात. बहुतांश विद्यार्थी आ. कि. मध्ये शिकतात, ज्यापैकी ५ विद्यार्थी इयत्ता १० वी च्या परीक्षेला प्रविष्ट झाले होते.

पाचही विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश मिळवत अकोलखेड गावाला तालुक्यातून प्रथम येण्याचा मान मिळवून दिला आहे.

पूर्वा केशव लांडे या विद्यार्थिनीने ९६.४० ३ गुण मिळवत तालुक्यातून प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. तर समर्थ गो.गणोरकार व चारूल जि.गुप्ता ९५.८०३ घेऊन तर परी प्र .फुलारी ९३.६०३ व आयुष अ.गणोरकार ९०.६०३ शेतकऱ्यांच्या विद्यार्थ्यांनी स्वतःच्या जिद्द चिकाटीवर अभ्यासाच्या जोरावर प्राविण्य श्रेणीत उत्तीर्ण झाले.

विद्यार्थ्यांचे हे नेत्रदीपक यश पाहता शाळेच्या वतीने आयोजित सत्कार भेटीकरीता शाळेचे नितीन झाडे, प्रा. नेहा झाडे, पवन चितोडे, आशीष पवार, विशाल वाबळे, अरुणा काळे, रुपाली मानकर, विद्यार्थ्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. सर्व स्तरातून विद्यार्थ्यांचे स्वागत अभिनंदन शुभेच्छांचा वर्षाव होत आहे, विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय, आई वडील, शाळेला समर्पित केले.

आ.प. स्कूल मध्ये मिळालेल्या सर्व स्तरातील, सर्व विद्यार्थ्यांना समान संधी, उत्कृष्ट शिकवणीच्या जोरावर मला हे यश मिळवणे शक्य झाले.

# प्रभागातील समस्यांवरून नगरसेवक मनोज पाटील आक्रमक

प्रतिनिधी १३ मे



**अकोला :** महापालिकेच्या मंगळवारी झालेल्या आमसभेत प्रभाग क्रमांक ८ चे शिवसेना नगरसेवक मनोज पाटील आपल्या प्रभागातील समस्यांवरून प्रशासनावर जोरदार बरसले. परिसरातील पाणीटंचाई आणि घंटागाड्यांची दुरवस्था या प्रश्नांवर त्यांनी प्रशासनावर कडक शब्दांत प्रहार केला.

सभागृहात १५ व्या वित्त आयोगाच्या निधीच्या नियोजनावर चर्चा सुरू असताना, मनोज पाटील यांनी आपल्या प्रभागातील पाणीटंचाई आणि घंटागाडीच्या मुद्द्यावरून प्रशासनाला धारेवर धरले. आपल्या अभ्यासपूर्ण भाषणाने त्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून तातडीने नियोजन करून प्रभाग ८ मधील पाणीटंचाईचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवावा, अशी मागणी त्यांनी सभागृहासमोर ठेवली. प्रभागात येणाऱ्या घंटागाड्यांवर तातडीने हेल्पर उपलब्ध करून देऊन कचरा संकलनाची समस्या मार्गी लावावी, अशी आग्रही मागणी त्यांनी केली.त्यांचा आक्रमक पवित्रा पाहून सभापती विजय अग्रवाल यांनी त्यांच्या प्रभागातील समस्यांचे लवकरात लवकर निराकरण करण्याचे आश्वासन दिले.

# अकोला टपाल विभागाचा सर्वोत्कृष्ट कर्मचारी वार्षिक सन्मान सोहळा




**अकोला :** टपाल विभागातर्फे १२ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवनात २०२५-२६ मध्ये पोस्ट ऑफिस बचत योजना, सुकन्या योजना, पोस्टल विमा, पोस्टल ग्रामीण विमा, आधार व्यवहार, शाखा डाकघर स्तरावरील डाक बुकिंग, इंडिया पोस्ट पेमेंट बँक – जनरल विमा, इंडिया पोस्ट पेमेंट बँक - खाती यामध्ये सर्वोत्कृष्ट कार्य केलेल्या कर्मचाऱ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. अतिशय आखीव रेखीव असा कार्यक्रम झाला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सुधीरजी जाखेरे, डाक निर्देशक, नागपुर क्षेत्र, नागपुर हे उपस्थित होते. श्री. सि. व्ही. रामीरेड्डी, वरीष्ठ अधिक्षक, डाकघर अकोला विभाग, अकोला यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवले. या कार्यक्रमामध्ये मागील आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये वरील प्रकारातील सर्वोत्कृष्ट कार्य केलेल्या कर्मचा-यांचा डॉ. सुधीरजी. जाखेरे मा. डाक निर्देशक, नागपुर यांच्या हस्ते उत्कृष्टता प्रमाणपत्र, पारितोषिक आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. डाक निर्देशक, नागपुर यांनी मागील आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. त्याचप्रमाणे चालू आर्थिक वर्षांमध्ये सुद्धा त्याच उमेदीने व उत्साहाने कार्य करावे याबाबत प्रोत्साहित केले. तसेच भारत सरकार आणि राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजना डाक विभागामार्फत शेवटच्या पात्र व्यक्ती पर्यंत कश्याप्रकारे पोहचवाव्यात या बद्दल मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे संचालन डी. के. पाथरकर, डाक सहाय्यक, अकोला यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संगीता एस. रत्तेसार, प्रधान डाकपाल, अकोला मुख्य डाकघर यांनी केले. या प्रसंगी गणेश सोनुने, सहाय्यक अधिक्षक, डाकघर (सेन्ट्रल), पी.सी.पंत, सहाय्यक अधिक्षक, डाकघर (मुर्तीजापुर), जी. बी. काळे, डाक निरीक्षक, वाशीम, एन. व्ही. वायाळ, तत्कालीन डाक निरीक्षक, वाशीम, पी. जी. शेगांवकर, तक्रार निरीक्षक, अकोला डाकविभाग, अकोला, अकोला विभागीय कार्यालयीन स्टाफ तसेच मोठ्या संख्येने अकोला डाक विभागातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# टिळक राष्ट्रीय शाळेत मांडूळ जातीचा दुर्मीळ साप आढळला!

**अकोला :** स्थानिक मोठ्या उमरीतील टिळक राष्ट्रीय शाळेत १२ मे रोजी सकाळी ९ वाजता गोरक्षण परिसरामध्ये दुर्मीळ असलेला मांडूळ या जातीचा साप आढळून आला. या सापाला माजी विद्यार्थी संघाने पकडून जीवदान दिले. यामध्ये विशेष परिश्रम माजी विद्यार्थी संघामधील शरद इंगोले यांनी शिताफीने सापाला पकडले. यासाठी त्यांना दिगंबर वनारे, उमेश मसने, सुनील भातुलकर, प्रमोद टाले, संजय पळसपगार, देवानंद इंगळे, गुड्डु अत्तरकार, गोलु अमृतकर आदी माजी विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. त्यानंतर या सापाला वनपरिक्षेत्र कार्यालय, अकोला येथील कार्यालयात तेथील कर्मचारी तसेच सर्प मित्र बाळ काळणे व अवारे यांचे स्वाधीन केले.

# मातोश्री परिवाराने अनाथ चिमुकल्यांना आणि वृद्धांना छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास दाखवला

प्रतिनिधी १३ मे



**अकोला :** कधीकधी आयुष्यात आनंदाचे काही क्षण मिळवण्यासाठी पैशांपेक्षा मोठ्या मनाची जास्त गरज असते. अकोल्यातील 'मातोश्री परिवारा'ने नुकतंच हे सिद्ध करून दाखवलं. ज्यांच्या नशिबात कुटुंबाचं छत्र नाही, अशा अनाथ आश्रमातील चिमुकल्यांना आणि ज्यांच्यापासून आपलीच माणसं दुरावली आहेत, अशा वृद्धाश्रमातील आजी-आजोबांना एकत्र आणत मातोश्री परिवाराने त्यांना शिवरायांचा जाज्वल्य इतिहास चित्रपटाच्या माध्यमातून दाखवला. हा केवळ चित्रपट नव्हता, तर दोन पिढ्यांमधील माणुसकीचा एक अनोखा संगम होता.

'सूर्योदय अनाथ आश्रम' आणि 'मातोश्री वृद्धाश्रमा'तील सुमारे १५० जणांसाठी अकोल्यात एका विशेष शोचे आयोजन करण्यात आले होते. थिएटरच्या अंधारात जेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांची एन्ट्री झाली, तेव्हा अनाथ मुलांनी दिलेल्या 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. या मुलांच्या चेहऱ्यावरील तो उत्साह आणि आजी-आजोबांच्या डोळ्यांतील कौतुकाचे भाव पाहण्यासारखे होते. अनेक वृद्धांनी तर अनेक वर्षांनंतर चित्रपटगृहाची पायरी चढली होती. महाराजांचा इतिहास पडद्यावर अनुभवताना अनेकांचे डोळे पाणावले, तर काहींना आपल्या तरुणपणाच्या आठवणींना उजाळा मिळाला.

मातोश्री परिवाराचे संचालक संग्रामभैय्या गावंडे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम साकार झाला. केवळ चित्रपट दाखवून ते थांबले नाहीत, तर या विशेष पाहुण्यांसाठी पॉपकॉर्न, कोल्ड्रिंक्स आणि चविष्ट अल्पोपहाराची शाही व्यवस्थाही करण्यात आली होती. थिएटरमध्ये मिळणारा तो 'लक्झरी' अनुभव या मुलांनी आणि वृद्धांनी पहिल्यांदाच इतक्या जवळून घेतला. सामाजिक भान आणि माणुसकीची जोड देत मातोश्री परिवाराने राबवलेला हा उपक्रम केवळ बातमी नसून, समाजातील प्रत्येकासाठी एक प्रेरणादायी धडा आहे. अकोल्यात सध्या या संवेदनशील उपक्रमाची सर्वत्र चर्चा आणि कौतुक होत आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. १३ मे २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# यवतमाळात पीक विम्यावरून संताप

## ‘सीसीई’तील त्रुटींमुळे लाखो शेतकरी लाभापासून वंचित; पालकमंत्र्यांवर दुर्लक्षाचा आरोप

प्रतिनिधी १३ मे

**यवतमाळ :** खरीप हंगाम २०२५-२६ मध्ये यवतमाळ जिल्ह्यातील कापूस, सोयाबीन व इतर पिकांसाठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत लाखो शेतकऱ्यांनी कोट्यवधी रुपयांचा विमा प्रीमियम भरला असतानाही जिल्ह्याला अद्याप पीक विम्याची भरपाई मिळालेली नाही. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री संजय राठोड यांच्या दुर्लक्षामुळे जिल्ह्यातील शेतकरी विमा लाभापासून वंचित राहिल्याचा आरोप करण्यात आला आहे. जिल्ह्यातील ३ लाख ६९ हजार ३६२ शेतकऱ्यांनी पीक विम्यासाठी तब्बल २६ कोटी ६७ लाख ५९ हजार ११३ रुपयांचा प्रीमियम भरला. त्यासोबतच केंद्र व राज्य शासनाकडून सुमारे १०७ कोटी १८ लाख ३९ हजार ८६० रुपयांचा हिस्सा अग्रिकल्चर इन्शुरन्स कंपनी ऑफ इंडियाकडे जमा करण्यात आला. अशाप्रकारे जिल्ह्याच्या नावावर जवळपास १३३ कोटी ८५ लाख ९८ हजार ९७३ रुपयांचा निधी जमा झाला. मात्र प्रत्यक्षात शेतकऱ्यांना विमा लाभ मिळालेला नसल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे कापूस व सोयाबीन पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. पिकांची वाढ खुंटणे, फुल व फळधारणा कमी होणे आणि उत्पादनात घट झाल्याने शासनाने जिल्ह्यास दुष्काळी मदत जाहीर केली होती. मात्र एकीकडे दुष्काळी परिस्थिती मान्य केली जात असताना दुसरीकडे पीक विमा लाभ नाकारणे हा मोठा विरोधाभास असल्याचे शेतकरी संघटनांचे म्हणणे आहे. पीक काढणी प्रयोग (सीसीई) प्रक्रियेत गंभीर त्रुटी झाल्याचा आरोपही करण्यात आला आहे. कृषी विभागाने निश्चित केलेल्या थ्रेशोल्ड यिल्ड (टीवाय) व ॲक्च्युअल यिल्ड (एवाय) आकडेवारीमुळे जिल्ह्याला “झिरो क्लेम” दाखविण्यात आल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये आहे. प्रत्यक्षात नुकसान मोठे असताना कागदोपत्री उत्पादन अधिक दाखविण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. दरम्यान, राज्यात सोयाबीन पिकासाठी १ हजार २१९ कोटी रुपयांची नुकसानभरपाई जाहीर झाली असली तरी त्यात यवतमाळ जिल्ह्याचा समावेश नसल्याने शेतकरी संभ्रमात आहेत. कपाशीच्या विम्याबाबतही अद्याप स्पष्टता नसल्याने नाराजी वाढत आहे. यासंदर्भात पालकमंत्री संजय राठोड यांनी तांत्रिक त्रुटींमुळे पोर्टलवर ‘शून्य रक्कम’ दिसत असल्याचे सांगितले असून कृषिमंत्री व प्रधान सचिवांशी चर्चा केल्याचा दावा केला आहे. मात्र सीसीई अहवाल व तांत्रिक माहिती वेळेत सादर करण्याची जबाबदारी प्रशासनाची असल्याने योग्य समन्वयाचा अभाव स्पष्ट झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. खरीप हंगाम २०२५-२६ मधील सर्व सीसीई अहवाल तसेच तालुकानिहाय टीवाय व एवाय आकडेवारी तातडीने सार्वजनिक करावी आणि संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या पत्रकार परिषदेला देवानंद पवार, राजू पडगीलवार, शंतनू शेटे व किसान मोर्चाचे अध्यक्ष पंजाब जाधव उपस्थित होते

### मुख्यमंत्र्यांवर खापर फोडण्याचा प्रयत्न?

पालकमंत्री संजय राठोड यांच्या नेतृत्वाखाली काही लोकप्रतिनिधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन विमा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची चर्चा आहे. मात्र जिल्हा प्रशासनाने चुकीचे पीक काढणी प्रयोग व अपूर्ण तांत्रिक माहिती वरिष्ठ स्तरावर पाठवल्याने ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे या प्रकरणाचे खापर मुख्यमंत्र्यांवर फोडण्याचा प्रयत्न होऊ नये, अशी प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली.

# १०८ मंडळांत अतिवृष्टी होऊनही सोयाबीनचा विमा नाकारला

## शिवसेनेचा संताप; थेट पंतप्रधान व केंद्रीय कृषिमंत्र्यांना निवेदन

प्रतिनिधी १३ मे



**यवतमाळ :** जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर सोयाबीन, कापूस आणि तूर पिकांचे नुकसान झाले असतानाही एकाही महसूल मंडळाला सोयाबीन पीक विम्यास पात्र न ठरवल्याने शिवसेना (शिंदे) आक्रमक झाली आहे. जिल्हा संपर्कप्रमुख हरिहर लिंगनवार यांच्या नेतृत्वात पंतप्रधान आणि केंद्रीय कृषिमंत्र्यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन सादर करून पीक नुकसानीचे पुनर्मूल्यांकन करण्याची मागणी करण्यात आली.

जिल्ह्यात यंदा सरासरीपेक्षा ३० ते ४० टक्के अधिक पाऊस झाला असून तब्बल १०८ महसूल मंडळांत अतिवृष्टीची नोंद झाली आहे. सततच्या पावसामुळे सोयाबीन पिकांचे मोठे नुकसान झाले. जिल्ह्यातील २.६४ लाख हेक्टर क्षेत्रापैकी सुमारे २.०९ लाख हेक्टर क्षेत्र बाधित झाल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. अनेक भागांत उत्पादन पूर्णपणे हातचे गेल्याचेही नमूद करण्यात आले. अनेक महसूल मंडळांची आणेवारी ५० टक्क्यांपेक्षा कमी असतानाही विमा कंपनीने यवतमाळ जिल्ह्याला विमा लाभापासून वंचित ठेवले. विशेष म्हणजे शेजारील नांदेड, वाशीम, अमरावती, वर्धा आणि चंद्रपूर जिल्ह्यांना विमा मंजूर झाला असताना यवतमाळवरच अन्याय का, असा सवाल शिवसेनेने उपस्थित केला आहे. सध्याच्या सॅटेलाईट आधारित पीक मूल्यांकन पद्धतीवरही निवेदनात तीव्र आक्षेप घेण्यात आला आहे. अतिवृष्टीमुळे शेतांमध्ये तण वाढल्याने सॅटेलाईट प्रतिमांमध्ये शेत हिरवेगार दिसत होते; मात्र प्रत्यक्षात सोयाबीन शेंगा लागल्या नव्हत्या आणि कापसाची बोंडे कुजली होती, असा दावा करण्यात आला. केवळ सॅटेलाईट प्रतिमांच्या आधारे नुकसान ठरविणे म्हणजे शेतकऱ्यांच्या डोळ्यात धूळफेक असल्याची टीका करण्यात आली.

पीक विमा मूल्यांकनासाठी मागील पाच वर्षांच्या सरासरी उत्पादनाऐवजी कृषी विद्यापीठाने मंजूर केलेले सरासरी उत्पादन गृहीत धरण्याची मागणी शिवसेनेने केली आहे. तसेच केवळ २०० चौरस मीटर क्षेत्रातील पीक कापणी प्रयोगावर संपूर्ण मंडळाचे भवितव्य ठरवू नये, प्रत्यक्ष शेतस्तरावर पाहणी अनिवार्य करावी आणि यवतमाळ जिल्ह्यातील नुकसानीचे विशेष पुनर्मूल्यांकन करून शेतकऱ्यांना तातडीने मदत जाहीर करावी, अशा मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत. जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देताना हरिहर लिंगनवार, श्रीधर मोहोड, जिल्हाप्रमुख गजानन डोमाळे, राजुदास जाधव, यशवंत पवार, संजय हातगावकर, संजय रंगे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

### सर्वपक्षीय बैठक घेण्याची मागणी

दरम्यान, जिल्ह्याचे पालकमंत्री तथा मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनीही मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना पत्र लिहून यवतमाळ जिल्ह्यास पीक विम्याचा लाभ तातडीने मिळवून देण्याची मागणी केली आहे. जिल्ह्यातील सुमारे ८० टक्के सोयाबीन क्षेत्र अतिवृष्टीमुळे बाधित झाले असतानाही विमा नाकारला जाणे हा शेतकऱ्यांवरील अन्याय असल्याचे त्यांनी पत्रात नमूद केले आहे. केवळ तंत्रज्ञानाधारित उत्पादन मोजणीवर विसंबून न राहता प्रत्यक्ष पीक कापणी प्रयोगांच्या आधारे विमा निश्चित करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. जिल्ह्यातील वाढता असंतोष लक्षात घेता मुख्यमंत्र्यांनी सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी आणि कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक तडीने बोलवावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

# ढाणकीत सर्वपक्षीय व नागरिकांचा रास्ता रोको

प्रतिनिधी १३ मे



**उमरखेड :** पुसद ते हरदडा रस्त्याचे काम संथगतीने सुरू असल्याने नागरिकांना होणारा त्रास वाढला आहे. याच पार्श्वभूमीवर ढाणकी येथील सर्वपक्षीय नेते व पंचक्रोशीतील नागरिकांनी आज 12 मे रोजी हरदडा फाटा येथे दोन तास रस्ता रोको आंदोलन केले. आंदोलनात शेकडो नागरिकांनी सहभाग घेतला. गावकऱ्यांनी एमएसआयडीसी विभागाला निवेदन देऊन रस्ता त्वरित सुरू करण्याची मागणी केली होती, परंतु कोणतीही कारवाई न झाल्यामुळे आंदोलक संतप्त झाले. रस्त्याच्या खोदकामामुळे ठिकठिकाणी खड्डे पडले असून दररोज अपघात घडत आहेत. उष्णतेच्या प्रचंड लाटेमध्ये नागरिकांना तसेच राहदारी करणाऱ्या वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत आहे. आंदोलनादरम्यान एमएसआयडीसीचे अभियंता संजय मानापुरे उशिरा पोहोचले. आंदोलकांचे प्रश्न ऐकताना त्यांनी स्पष्ट उत्तर न देता टाळाटाळ केली, सहाय्यक पोलीस निरीक्षक विनायक रामोड, उपनिरीक्षक गणेश मुंढे व उपनिरीक्षक सागर अन्नमवार यांनी मध्यस्थी करून परिस्थिती शांत केली. अखेरीस अभियंत्याने कंपनीच्या लेटरहेडवर लेखी आश्वासन दिले की 30 जूनपर्यंत रस्त्याच्या एका बाजूचे काम पूर्ण करून रहदारी योग्य केली जाईल, त्यानंतर आंदोलन मागे घेतले गेले. आंदोलनात काँग्रेसचे बाळासाहेब चंद्रे पाटील, शिवसेनेचे दत्त दिगंबर वानखेडे, मनसेचे तालुकाध्यक्ष सादिक शेख, आझाद समाज पार्टीचे जॉन्टी विणकरे, प्रणिता कांबळे, शेख बशीर, गजानन मिटकरे, संभाजी गोरटकर, प्रशांत जोशी, सैय्यद माजीद, बाबुराव नरवाडे, गजानन चंद्रे, शादुल भाई, राहूल नरवाडे, चंद्रकांत कानकाटे, बंडू कवडे, बाळू पायघन, बालाजी काळे, सुनिल बुरसे, बंटी वाळके, मारोती वानखेडे, विलास पायघन, शिवाजी वानखेडे, मुन्ना रहेमान, हाफीज नवाब, बिबन कुरेशी सह शेकडो कार्यकर्ते व नागरीक उपस्थित होते.

# महावितरणची अनागोंदी: विद्युत पुरवठा ठप्प

प्रतिनिधी १३ मे

**उमरखेड :** प्रचंड उकाड्यात चिल्ली गावातील नागरिक अक्षरशः कासावीस झाले आहेत. पाच दिवसांपासून अर्ध्या गावाचा विद्युत पुरवठा ठप्प असल्यामुळे अबालवृद्ध, गर्भवती महिला आणि लहान मुले प्रचंड त्रस्त आहेत.

गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, महावितरणच्या उमरखेड ग्रामीण कार्यालयाशी वारंवार संपर्क साधला असतानाही अधिकारी कुठलाही प्रतिसाद देत नाहीत. मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्यास अधिकारी फोन बंद ठेवतात. यामुळे नागरिकांमध्ये संताप वाढला असून, विद्युत पुरवठा सुरळीत न केल्यास आंदोलनाची शक्यता वर्तवली जात आहे.गावकरी सांगतात, मागील आठ ते दहा दिवसांपासून विजेचा लपंडाव सुरू आहे, तर मागील पाच दिवसांपासून अर्ध्या गावाचा पुरवठा पूर्णपणे खंडित आहे.

43–44 अंश सेल्सिअस तापमानात प्रचंड उष्णतेमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून मच्छरांचा प्रादुर्भावही वाढला आहे. सामाजिक कार्यकर्ते अंकुश राठोड आणि संतोष आडे यांनी म्हटले, “उकाड्यात लोकांना त्रास होत असून, उमरखेड ग्रामीणच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ विद्युत पुरवठा सुरळीत करावा, अन्यथा आंदोलनात्मक पावित्रा घ्यावा लागेल.” गावकऱ्यांची मागणी आहे की महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनाकडे गंभीर दखल घ्यावी आणि गावातील खंडित वीजपुरवठा लवकरात लवकर सुरळीत करावा.

# गुरुकुल कॉन्व्हेंटचे एसएससी निकालात यश

प्रतिनिधी १३ मे






**पुसद :** स्व. शंकरराव चापके बहुउद्देशीय संस्थेअंतर्गत संचालित गुरुकुल कॉन्व्हेंट अँड ज्युनिअर कॉलेज (सायन्स अँड आर्ट्स), पुसद येथील विद्यार्थ्यांनी एसएससी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळेची उज्ज्वल निकाल परंपरा कायम राखली आहे. विद्यार्थ्यांच्या यशामुळे संस्थेचे, शिक्षकांचे व पालकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

संस्था चालविताना आलेल्या विविध अडचणी, पालकांनी संस्थेवर दाखविलेला विश्वास आणि विद्यार्थ्यांची मेहनत यामुळे यंदाही उत्कृष्ट निकालाची परंपरा अबाधित राहिल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले. या परीक्षेत श्रावणी बी. शिंगणे हिने ९१.८० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. गार्गी व्ही. मास्के हिने ८९.२० टक्के गुण मिळविले. प्राप्ती आर. राठोड आणि यश के. राठोड यांनी प्रत्येकी ८८.८० टक्के गुण मिळविले, तर प्रगती बी. जाधव हिने ८८ टक्के गुण प्राप्त केले. तसेच साहील आर. धेंगले याने ८६.४० टक्के, कृष्णा व्ही. वानखेडे याने ८५.२० टक्के, निर्मिती आर. राठोड हिने ८२.४० टक्के, नैतिक पी. राठोड याने ८०.६० टक्के गुण मिळवत यश संपादन केले. उर्वरित विद्यार्थ्यांनीही चांगले गुण मिळवत शाळेच्या यशात भर घातली. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यास शुभेच्छा दिल्या. “Dream Big... Study Hard... Shine Bright” हा संदेश विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

# पक्ष्यांसाठी जलपात्र व अन्नसाखळी उपक्रम सुरू

प्रतिनिधी १३ मे

**पुसद :** वाढत्या उन्हाळ्यामुळे पक्ष्यांना पाणी आणि अन्नाची कमतरता जाणवत असल्यामुळे सप्तगिरी नगर, पुसद येथील श्री स्वामी समर्थ मंदिर समिती यांनी एक अनोखा पर्यावरण संवर्धनात्मक उपक्रम राबवला आहे. मंदिर समिती व सेवाधारी भक्तांच्या सहकार्याने पक्ष्यांसाठी जलपात्र व अन्नसाखळीचे व्यवस्थापन केले गेले आहे.

मंदिर परिसरातील विविध ठिकाणी जलपात्र ठेवून त्यामध्ये दररोज स्वच्छ पाण्याची व्यवस्था केली जाते. तसेच पक्ष्यांसाठी गहू, ज्वारी, बाजरी आणि इतर धान्य ठेवून अन्नसाखळीची सोय करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे परिसरातील चिमण्या, कबुतरे, कावळे व इतर पक्ष्यांना उन्हाळ्यात मोठा दिलासा मिळत आहे. मंदिर समितीने नागरिकांनाही आपल्या घरासमोर जलपात्र ठेवण्याचे आवाहन केले आहे. समितीच्या प्रतिनिधींनी सांगितले, “उन्हाळ्यात पक्ष्यांची काळजी घेणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी आहे. या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाला चालना मिळेल आणि पक्ष्यांसाठी जीवितावश्यक सुविधा उपलब्ध होतील.” या उपक्रमामुळे नुसते पक्ष्यांना मदत होत नाही, तर परिसरातील नागरिकांमध्ये नैसर्गिक संवेदनशीलतेची भावना वाढत असून पर्यावरण आणि प्राणी संवर्धनासाठी प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे. सप्तगिरी नगरच्या रहिवाशांनी देखील मंदिर समितीच्या या प्रयत्नाचे स्वागत केले असून भविष्यात अशा उपक्रमांना चालना देण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

# खा. प्रतिभा धानोरकरांची उकणी कोळसा खाणीला भेट; कामगारांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना करा

प्रतिनिधी १३ मे



**वणी:** उकणी येथील कोळसा खाण दुर्घटनेनंतर खासदार प्रतिभाताई धानोरकर यांनी काँग्रेस कमिटीचे महाराष्ट्र प्रदेश सचिव संजय खाडे यांच्यासह प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. त्यांनी WCL प्रशासनाला धारेवर धरत अपघाताबाबत जाब विचारला आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.

दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. तसेच परिसरातील विविध कंपन्यांमध्ये स्थानिक प्रकल्पग्रस्त नागरिक व त्यांच्या मुलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी केली. वणी परिसरात मोठ्या प्रमाणावर कोळसा खाणी असल्यामुळे कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला असून भविष्यात कोणताही अपघात टाळण्यासाठी प्रशासनासोबत सविस्तर चर्चा झाली. दुर्घटनेत बाधित झालेल्या खाणकामगार आसुटकर यांच्या घरी जाऊन त्यांची प्रकृतीही पाहणी करण्यात आली. यावेळी उकणी तसेच पिंपळगाव गावांच्या पुनर्वसन, उर्वरित जमीन संपादन आणि प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना रोजगार याबाबतही प्रशासनासोबत चर्चा झाली. पाहणी दौऱ्यात WCL मुख्य महाप्रबंधक खन्ना, उपक्षेत्रीय प्रबंधक स्वामी तसेच WCL प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते. काँग्रेसकडून WCL TSC सदस्य तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव संजय खाडे, प्रमोद वासेकर, राजीव अंकितवार, अशोक चिकटे, विकेश पानघाटे, नंदू आसुटकर, बंडुभाऊ खीरटकर, मनोज खाडे, दादा खेडेकर, सुभाष ढवळे यांच्यासह उकणी गावासह परिसरातील सुशिक्षित बेरोजगार युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आर्णीत सेवानिवृत्त कामगार उपायुक्त राजेश आडे यांचा जंगी सत्कार

प्रतिनिधी १३ मे



**आर्णी :** मुंबई येथील कामगार उपायुक्त पदावरून नुकतेच सेवानिवृत्त झालेले राजेशजी भाऊसिंग आडे यांचा आर्णी येथे विविध सामाजिक, धार्मिक व व्यापारी संघटनांच्या वतीने उत्साहात सत्कार करण्यात आला. दि. ३० एप्रिल २०२६ रोजी शासकीय सेवेतून निवृत्त झाल्यानंतर त्यांच्या सन्मानार्थ आयोजित कार्यक्रमात मान्यवरांनी शुभेच्छांचा वर्षाव केला. या सत्कार सोहळ्याचे आयोजन गजानन सागराबाई रामचंद्र केणे महाराज यांनी केले होते. यावेळी आर्णी पत्रकार संघ, साधू-संत, महात्मे, सायकलिंग क्लब, व्यापारी वर्ग तसेच विविध क्षेत्रांतील नागरिकांनी आडे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. मुंबईसारख्या महानगरात कामगार उपायुक्त म्हणून कार्यरत असताना आडे यांनी अनेक कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी उल्लेखनीय कार्य केले. त्यांच्या प्रशासनातील अनुभवाचा समाजाला भविष्यातही लाभ होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. यावेळी मान्यवरांनी आडे यांच्या पुढील सामाजिक, राजकीय व आध्यात्मिक वाटचालीस शुभेच्छा देत, “त्यांचे पुढील आयुष्य सुख, समृद्धी आणि भरभराटीचे जावो,” अशा भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाला परिसरातील नागरिक, हितचिंतक आणि विविध संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शासकीय सेवेतून निवृत्तीनंतरही आडे यांची सामाजिक क्षेत्रातील नवी इनिंग अधिक प्रभावी ठरेल, असा आशावाद उपस्थितांनी व्यक्त केला.

# सामाजिक बांधिलकीतून २७०० हून अधिक विवाह जुळविले

## धनसळच्या नामदेव ताळीकोटे यांचे चार दशकांपासून अविरत कार्य

प्रतिनिधी १३ मे

**पुसद :** आधुनिक काळात विवाहयोग्य मुला-मुलींसाठी योग्य स्थळ शोधणे ही पालकांसमोरील मोठा प्रश्न बनला आहे. अशा परिस्थितीत पुसद तालुक्यातील धनसळ येथील नामदेव गणाजी ताळीकोटे यांनी गेल्या चार दशकांपासून कोणतीही अपेक्षा न ठेवता सामाजिक बांधिलकी जपत तब्बल २७०० हून अधिक विवाह जुळवून दिले आहेत. त्यामुळे परिसरात त्यांना प्रेमाने “घरजोडे” म्हणून ओळखले जाते.

डोंगरकपारीत वसलेल्या धनसळ या छोट्याशा गावातील नामदेव ताळीकोटे यांनी वयाच्या अवघ्या १२ व्या वर्षी ‘मून लाईट सर्कस’मध्ये काम करण्यास सुरुवात केली. काही काळानंतर त्यांनी ते काम सोडून समाजकार्यात स्वत:ला झोकून दिले. त्यानंतर सोलापूर, नागपूर, पुणे, रत्नागिरी, सांगली आदी भागांत भ्रमंती करत विविध जाती-धर्मांतील विवाह जुळविण्याचे कार्य सुरू केले. सन १९८० पासून सुरू झालेल्या या उपक्रमातून त्यांनी आजपर्यंत २७०० हून अधिक विवाह जुळवून दिले आहेत. जानेवारी २०१८ नंतर आणखी ४७ विवाह जुळल्याची माहिती त्यांनी दिली. यामध्ये इस्लाम धर्मातील सात तर इतर समाजातील ४० विवाहांचा समावेश आहे.

विवाह जुळविताना दोन्ही पक्षांची संपूर्ण माहिती घेऊन ती एकमेकांना दिली जाते. संबंधित कुटुंबांची तयारी झाल्यानंतर पुढील प्रक्रिया सुरू केली जाते. विवाहानंतर कोणतीही जबाबदारी आपण घेत नसल्याचे नामदेवराव स्पष्टपणे सांगतात. प्रवासादरम्यान किंवा विविध कार्यक्रमांत विवाहयोग्य वधू-वरांची माहिती मिळविण्याचा ते सातत्याने प्रयत्न करतात. संबंधितांची नावे, पत्ते व मोबाईल क्रमांक डायरीत नोंदवून ठेवले जातात. योग्य स्थळ उपलब्ध झाल्यानंतर संबंधित कुटुंबांशी दूरध्वनीवरून संपर्क साधला जातो. त्यामुळे सर्व धर्मीय समाजात त्यांची वेगळी ओळख निर्माण झाली आहे. “सामाजिक कार्यातून मिळणारा आनंद जीवन जगण्याची प्रेरणा देतो. महादेवाच्या पिंडीवर जशी बेलपत्र अर्पण करतात, तशीच समाजसेवा करण्याची माझी भावना आहे,” असे नामदेव ताळीकोटे यांनी सांगितले. “प्रवासात कोणत्याही समाजातील व्यक्ती भेटली तरी तिचा संपर्क क्रमांक व पत्ता घेण्याचा प्रयत्न करतो. मुलींच्या कुटुंबांना योग्य दिशा दाखविणे हेच माझे खरे काम आहे,” असेही त्यांनी नमूद केले. आजही नामदेव ताळीकोटे यांचे हे कार्य अविरत सुरू असून समाजात विवाहबंधन जुळविणाऱ्या “घरजोडे” म्हणून त्यांचे नाव आदराने घेतले जाते.



# शेतमाल खरेदी-विक्रीसाठी परवाना बंधनकारक

**यवतमाळ:** राज्यामध्ये शेतमाल खरेदी-विक्री व्यवहार करण्यासाठी व्यापारी, संस्था तसेच शेतकरी उत्पादक कंपन्यांनी वैध परवाना घेणे बंधनकारक असल्याचे पणन संचालनालयाने स्पष्ट केले आहे. याबाबतचे परिपत्रक पणन संचालक शरद जरे यांनी जारी केले आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व नियम १९६७ हा कायदा अस्तित्वात आहे. या कायद्यामधील तरतूदीनुसार राज्यातील शेतमाल खरेदी-विक्री चे विनियमन करण्यात येते. सद्या राज्यामधील विविध भागामध्ये अनेक व्यापारी, काही संस्था, शेतकरी संस्था या मोठ्या प्रमाणात शेतमालाची खरेदी विक्री कोणत्याही परवान्याविना करीत असल्याबाबतच्या तक्रारी पणन संचालनालयास प्राप्त झालेल्या आहेत.

**नगर परिषद आर्णी जि. यवतमाळ**

Email: mcarni4@gmail.com — दुरध्वनी क्र. ०७२३४-२६६७२६

जा.क्र./नपआ/मिळकत/कावि-७७४/२०२६ — दिनांक: १२/०५/२०२६

**जाहीर सुचना (दुसरी वेळ)**

सर्व जनतेला या व्दारे सुचित करण्यात येते की, आर्णी नगर परिषद च्या अधिकार क्षेत्रातील खालील कामांचा जाहीर लिलाव करण्यात येत आहे. तरी भाग घेणाऱ्या इच्छुक व्यक्तीने सदर लिलावात उपस्थित राहावे.

| अ. क्र. | कामाचे नाव | लिलावाचे ठिकाण | लिलावाची तारीख व वेळ | बोलीसाठी भरावयाची अनामत रक्कम | बोलीची प्रारंभिक रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | आठवडी बाजार, इतर रस्त्यालगतचे किरकोळ विक्रेते व कत्तलखाने फी वसुली | मुख्याधिकारी दालन नगर परिषद, आर्णी | दि.२०/०५/२०२६ रु. दुपारी १२.०० वाजता | रू. २५,०००/- (पंचविस हजार रुपये) | रु. ३,६०,०००/- (तीन लक्ष साठ हजार) | कार्यारंभ आदेशापासुन १ वर्ष |
| २ | दैनंदीन वसुली, इतर रस्त्यालगतचे किरकोळ विक्रेते व कत्तलखाने फी वसुली | मुख्याधिकारी दालन नगर परिषद, आर्णी | दि.२०/०५/२०२६ रु. दुपारी १२.०० वाजता | रू. २५,०००/- (पंचविस हजार रुपये) | रु. ३,६०,०००/- (तीन लक्ष साठ हजार) | कार्यारंभ आदेशापासुन १ वर्ष |

टीप :- अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत न.प. कार्यालयाचे सुचना फलकावर पहावयास मिळेल.

(रविंद्र राऊत)
मुख्याधिकारी
नगर परिषद आर्णी

सिटी न्यूज अमरावती

बुधवार, दि. १३ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# नियोजनाचा निधी तातडीने खर्च होण्यासाठी प्रयत्न करावेत – जिल्हाधिकारी आशिष येरेकर

प्रतिनिधी १३ मे

**अमरावती :** चालू आर्थिक वर्षासाठी जिल्हा नियोजनला ६०५ कोटी रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. सध्यास्थितीमध्ये प्राप्त निधीच्या खर्चासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात येतील. त्यामुळे यंत्रणांनी जिल्हा नियोजनचा निधी तातडीने खर्च होण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.



महसूल भवनातील बैठकीला जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे यांच्यासह यंत्रणांचे प्रमुख उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी सुरुवातीला जिल्हा नियोजनच्या बैठकीमधील उपस्थित मुद्यांबाबत अनुपालन अहवालाबाबत माहिती घेतली. त्यानंतर यावर्षी मंजूर निधीपैकी ६० टक्के निधी प्राप्त झाला असल्याने प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे यंत्रणांनी तातडीने याबाबत कार्यवाही सुरू करावी. येत्या जूनमध्ये प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. प्रशासकीय मान्यता घेताना कामाच्या याद्यांबाबत लोकप्रतिनिधींना विश्वासात घ्यावे. त्यानंतर प्रस्ताव सादर करावेत. जिल्हा नियोजनच्या कामांना एमएच-यूडीआयडी क्रमांक देण्यात येणार आहे. त्यामुळे ही कार्यवाही तातडीने पूर्ण करण्यात यावी.

प्रशासकीय मान्यता दिलेला निधी याच वर्षी खर्च होईल, याची दक्षता घ्यावी. शासनाने व्हीपीडीए यंत्रणा दिलेली असली तरी यात असलेला निधी वर्षभरातच वापरावा लागणार आहे. त्यानंतर यातील निधी आपोआप व्यपगत होत असल्याने याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. जिल्हा नियोजनमधून केलेल्या कामांना कार्यालय प्रमुखांनी भेटी द्याव्यात. यात कामाचा दर्जा तपासण्यात यावा.

जिल्हा परिषद आणि अन्य यंत्रणांना निधी दोन वर्षे खर्च करण्याची परवानगी आहे. त्यामुळे गेल्यावर्षीची कामे तातडीने पूर्ण होतील, याची काळजी घ्यावी. तसेच सेवा हक्क अधिनियमात अधिसूचित सेवा विहित कालमर्यादेत देण्यात यावा. याबाबत कार्यालयाला प्राप्त अर्ज निकाली काढावेत. याबाबत नियमित आढावा घेण्यात यावा, असे निर्देशही जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी दिले.

# घरफोडी करणारा आंतरराज्यीय गुन्हेगार ताब्यात

♦ १८ लाख रक्कमेचे सोने, चांदी व रोख रक्कम जप्त

प्रतिनिधी १३ मे




**अमरावती:** अमरावती शहर गुन्हे शाखे कडुन घरफोडी करणारा आंतरराज्यीय गुन्हेगार ताब्यात घेवुन त्यांचेकडुन एकुण ०८ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणण्यात यश आले.

पोलीस आयुक्त यांनी अमरावती शहरातील घरफोडी चे गुन्हे उघडकिस आणणे बाबत आदेशीत केलेवरून पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, गुन्हे शाखा अमरावती शहर यांचे नेतृत्वात पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार नेमुन खालील प्रमाणे कार्यवाही केली आहे.

पो.स्टे. फेजरपुरा येथील अप क. ३४२/२०२६ कलम ३३१ (४), ३०५ (अ) भा.न्या. सं प्रमाणे दाखल असुन सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत असतांना सदरचा गुन्हा हा रेकॉर्ड वरील घरफोडी करणारा गुन्हेगार अशोक प्रतापसिंह शिकलीकर रा. सिगनोर ता. गोगावा जि. खरगोण (म.प्र.) याने केला असल्याचे तपासा दरम्यान निष्पन्न झाले सदर आरोपी हा घरफोडी चोरी करणारा सराईत गुन्हेगार असुन त्याचे वर घरफोडी विविध राज्यात गुन्हे दाखल आहेत. सदर आरोपीचे कोणतेही निश्चित असे राहण्याचे ठिकाण नसुन तो मोबाईलचाही वापर करत नाही तसेच तो गुन्हे केल्या चारचाकी वाहनाने अमरावती शहरातुन निघुन जातो त्यामुळे सदर आरोपीला पकडणे पोलीसोसमोर आवाहन होते. दिनांक ०६.०५.२०२६ रोजी गुन्हे शाखेचे पथक खरगोण मध्य प्रदेश येथे जावुन सलग ६ दिवस आरोपीचा अतिशय दुर्गम अश्या भागात शोध घेवुन खालील आरोपींना आज दिनांक १२.०५.२०२६ रोजी सिगणोर ता. गोगावा जि. खरगोण राज्य मध्य प्रदेश येथुन ताब्यात घेण्यात आले. आरोपींकडे गुन्हयाचे अनुषंगाने तपास केला असता आरोपींनी अमरावती शहरात व इतर ठिकाणी खालील गुन्हे केल्याची कबुली दिली आहे.

अशोकसिंह प्रतापसिंह शिकलीकर वय ३३ वर्ष रा. सिगणोर ता. गोगावा जि. खरगोण राज्य मध्य प्रदेश. , धिरज शामलाल केसरवाणी वय ३५ वर्ष रा. सिगणोर ता. गोगावा जि. खरगोण राज्य मध्य प्रदेश असे असून फरार आरोपीतांची नावे राहुल प्रधानसिंह शिकलीकर रा. नंदुरबार ह.मु. सिगणोर ता. गोगावा जि. खरगोण जागरसिंह दयालसिंह शिकलीकर रा. नंदुरबार ह. मु. सिगणोर ता. गोगावा जि. खरगोण ,राजेन्द्रसिंह जितसिंह शिकलीकर रा. सिगणोर ता. गोगावा जि. खरगोण राज्य मध्य प्रदेश,संदीपसिंह सोनारसिंह शिकलीकर रा. आकाश नगर इंदोर असे आहे.

# नितीन धांडे यांचा अभिष्टचिंतन सोहळा थाटात

♦ डॉ. नितीन धांडे हे संयम, शिस्त व संवाद यांचे प्रतीक - पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे ♦ वाढदिवसानिमित्त सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव

प्रतिनिधी १३ मे

**अमरावती :** भाजपा अमरावती शहर जिल्हा अध्यक्ष तथा विदर्भयुथ वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष तसेच अमरावती जिल्हा नियोजन समितीचे सदस्य डॉ. नितीन धांडे यांचा वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा सर्वपक्षीय नेते मंडळी तथा हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमध्ये विविध सामाजिक, धार्मिक व जनहिताच्या उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.



सकाळी अंबादेवी व एकविरा देवी मंदिरात महाआरती करण्यात आली. गोरक्षण संस्थेत लापशी तुला कार्यक्रम पार पडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच इरविन चौक येथे केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. जिल्हा सामान्य रुग्णालयात रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना फळांचे वाटप करण्यात आले.

मुख्य 'अभिष्ट चिंतन सोहळा' संध्याकाळी संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथील लॉन मध्ये राज्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, माजी खासदार नवनीत राणा, आमदार प्रताप दादा अडसड, किरण पातूरकर, प्रा. रवींद्र खांडेकर, सुनील वऱ्हाडे , रमेश बुंदिले,प्रदेश प्रवक्ते शिवराय कुलकर्णी यांनी शुभेच्छापर भाषणे केली.

डॉ. नितीन धांडे यांना शुभेच्छा देताना माजी खासदार सौ नवनीत राणा यांनी त्यांच्या शैली मध्ये जोरदार फटकेबाजी करत डॉ नितीन धांडे यांनी लवकरात लवकर आमदार व्हावे व त्यांना व्यासपीठावरील सर्वांचा आशीर्वाद मिळावा अशा शुभेच्छा दिल्या,आगामी विधान परिषद निवडणुकीसाठी त्यांच्या उमेदवारीचा गांभीर्याने विचार करावा, असे आवाहन त्यांनी भाजपा नेतृत्वाला केले.

प्रमुख अतिथी म्हणून शुभेच्छा देताना पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी डॉक्टर नितीन धांडे यांच्या नेतृत्वाचा उल्लेख करत अमरावती शहराच्या संघटनात्मक बळकटीमध्ये डॉक्टर नितीन धांडे,यांचे महत्त्वपूर्ण योगदान सांगितले,डॉ. धांडे यांच्या जीवनातील अनेक बाबींना स्पर्श करत एक उच्च विभूषित डॉक्टर, विदर्भातील नामांकित शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आणि भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष म्हणून डॉक्टर धांडे यांनी त्यांच्या कार्याचा ठसा प्रत्येक क्षेत्रामध्ये कसा उमटविला याबाबत देखील उल्लेख केला,सोबतच त्यांच्या राजकीय भावी वाटचालीला शुभेच्छा देताना डॉ. धांडे यांना भारतीय जनता पार्टी अनेक मोठ्या जबाबदाऱ्या वेळेनुसार देणार

डॉ. धांडे यांनी अमरावतीत भाजपा वाढविण्यासाठी दिलेल्या योगदानाचे कौतुक केले त्यांचे संयमी नेतृत्व, शिस्तबद्ध कार्यपद्धती आणि संवाद कौशल्य प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. पुढील राजकीय वाटचालीसाठी पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले तसेच डॉक्टर धांडे यांनी राजकीय क्षेत्रामध्ये जे काही स्वप्न बघितले असतील ते सर्व पूर्ण होत अशी आई जगदंबा महालक्ष्मीच्या चरणी प्रार्थना करतो असा उल्लेख देखील बावनकुळे यांनी केला.

डॉ. नितीन धांडे यांनी चंद्रशेखरजी बावनकुळे, नवनीतजी राणा डॉअनिलजी बोंडे,तसेच व्यासपीठावरील सर्व नेते मंडळी तथा शुभेच्छा द्यायला आलेले सर्व स्नेही वर्ग व आयोजन समितीचे आभार मानत समाजहित व पक्षवृद्धीसाठी आपले कार्य यापुढेही सुरू ठेवणार असल्याचे सांगितले.

यावेळी महापौर श्रीचंद तेजवानी, माजी आमदार प्रवीण पोटे, उपमहापौर सचिन भेंडे, जयंत डेहनकर, रविराज देशमुख,बाळासाहेब हिंगनिकर, डॉ. अविनाश चौधरी, माजी महापौर सौ रीना नंदा कौर, चेतन गावंडे, बादल कुलकर्णी, ललित समदुरकर, सुनील काळे, सचिन रासने, कौशिक अग्रवाल, संजय तिरथकर, संजय नरवणे, राधा कुरिल, अँड. प्रशांत देशपांडे,राजू कुरिल, चेतन पवार, गगा खारकर, सुरेखा लुगारे, सुधा तिवारी, राजेंद्र मेटे, गजानन देशमुख, प्रवीण वैश्य, कामेश शाहू, ऋषिकेश देशमुख, संध्या टिकले, सुमित पवार,कुसुम शाहू, मिलिंद बांबल, कुणाल टिकले, सुधीर थोरात, प्रवीण उईके, एजाज अख्तर, निलेश काजे, दीपक पोहेकर, सचिन डाके, रविकांत कोल्हे, अश्विन राऊत, विशाल डहाके, राजेश गोफणे, प्रकाश सरदार, अमोल साळुंखे,यांच्यासह अमरावती महानगरपालिकेचे सर्व नगरसेवक, अमरावती जिल्ह्यातील सर्व नगरपालिका नगरपरिषद व नगरपंचायत चे नगराध्यक्ष व नगरसेवक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमरावती विभागाच्या राज्य सेवा हक्क आयुक्तपदी अरुण डोंगरे



**अमरावती:** सामान्य प्रशासन विभागाच्या ३० एप्रिल २०२६ च्या अधिसूचनेनुसार अरुण किशोर डोंगरे यांची अमरावती विभागाच्या राज्य सेवा हक्क आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली. राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव यांनी श्री. डोंगरे यांना पद व गोपनियतेची शपथ दिली. नवीन प्रशासन भवन, मुंबई येथील महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाच्या कार्यालयात झालेल्या शपथग्रहण सोहळ्यामध्ये माजी आयुक्त दिलीप शिंदे यांनी नियुक्तीची अधिसूचना वाचून दाखविली. अमरावती विभागाच्या राज्य सेवा हक्क आयुक्तपदी काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल नवनियुक्त आयुक्त अरुण डोंगरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव तसेच वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांचे आभार मानले. या शपथविधी सोहळ्याला विधानसभा सदस्य करण देवतळे, राज्याचे मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे, कोकण विभागाचे राज्य सेवा हक्क आयुक्त बलदेव सिंह, पुणे विभागाचे राज्य सेवा हक्क आयुक्त सुधाकर तेलंग तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# छत्रपती संभाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्य उद्या मानवंदना

♦ लोक गायक अवधूत गांधी यांचा शिववाणीतून रंगणार लोकसंगीत व भक्ती शक्ती सोहळा

प्रतिनिधी १३ मे

**अमरावती :** स्वराज्याचे दुसरे छत्रपती, अपराजित योद्धा, स्वराज्य रक्षक, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा ३६९ वा जन्मोत्सवा निमित्य दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा छत्रपती संभाजी महाराज स्मारक समिती व शोध प्रतिष्ठान अमरावतीच्या वतीने गुरुवार दिनांक १४ मे २०२६ रोजी सायंकाळी ७.०० वाजता



स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज चौक नवसारी रिंग रोड अमरावती येथे मानवंदना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य संजय खोडके साहेब तसेच प्रमुख अतिथी म्हणून अमरावती विधानसभा मतदार संघाच्या आमदार सुलभाताई संजय खोडके तसेच विशेष अतिथी म्हणून महाराष्ट्राला सुपरिचित असलेले प्रख्यात लोकगायक व कलावंत अवधूतजी गांधी यांची उपस्थिती लाभणार आहे.

अशी माहिती युवा नेते यश खोडके यांनी पत्र परिषदेमध्ये दिली. मानवंदना कार्यक्रमा नंतर श्री.अवधूतजी गांधी हे आपल्या सुमधुर वाणीतून शिव-शंभू यांची ख्याती विशद करणाऱ्या भक्ती - शक्ती संगीतमय कार्यक्रमाची प्रस्तुती देणार आहे. या रंगतदार कार्यक्रमातून मराठामोठ्या संस्कृतीचे दर्शन व वारकरी सेवेचा वारसा जपत शिवकालीन घटना व प्रसंगांना उजाळा मिळणार आहे. याशिवाय आकर्षक रोषणाई , सजावट, ढोल पथक, शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा, वादन व दमदार आवाज हे या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण राहणार आहे. अशी माहिती शोध प्रतिष्ठान अमरावतीचे अध्यक्ष यश खोडके यांनी पत्रकार परिषदेतून दिली.

# आरोग्य विभागाची गरुडझेप : २८ बालकांना थॅलेसिमियामुक्त नवजीवन!

प्रतिनिधी १३ मे

♦ जागतिक थॅलेसिमिया दिनानिमित्त 'एचएलए' तपासणी शिबिर

**अमरावती :** एका आईच्या डोळ्यांतील आनंदाश्रू, वडिलांच्या चेहऱ्यावर उमललेले हास्य आणि रक्ताच्या बाटल्यांपासून मुक्त झालेलं बालपण... हे सुखद चित्र आज अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयामुळे साकार झाले आहे. 'जागतिक थॅलेसिमिया दिनाचे' औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या विशेष शिबिरात अमरावती आरोग्य विभागाने थॅलेसिमियामुक्तीच्या दिशेने एक आशादायी पाऊल टाकले असून, आतापर्यंत २८ बालकांना यशस्वी बोन मॅरो ट्रान्सप्लांटद्वारे नवे आयुष्य मिळाले आहे. जिल्हा सामान्य



रुग्णालयातील डे केअर युनिट आणि संकल्प इंडिया फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक थॅलेसिमिया दिनानिमित्त मोफत एचएलए (र्ष्टं) तपासणी शिबिर नुकतेच पार पडले. बोन मॅरो ट्रान्सप्लांटसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या तपासणीमुळे अनेक बालकांना भविष्यात थॅलेसिमियामुक्त जीवन जगण्याची नवी आशा मिळाली आहे. या शिबिरात २० बालकांच्या कुटुंबीयांची तपासणी करण्यात आली.

विशेष म्हणजे, ज्या रुग्णांना अधिक गुंतागुंतीच्या चाचण्यांची गरज आहे, त्यांचे नमुने जर्मनी येथे पाठवण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. थॅलेसिमियाग्रस्त बालकांसाठी बोन मॅरो ट्रान्सप्लांट ही केवळ वैद्यकीय प्रक्रिया नसून ती त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबियांच्या आयुष्याला मिळालेली नवसंजीवनी आहे. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विनोद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व संकल्प इंडिया फाउंडेशनच्या सहकार्याने आयोजित या उपक्रमाने थॅलेसिमियाशी झुंज देणाऱ्या कुटुंबांना नवआयुष्याची उमेद मिळाली आहे.

# विद्यापीठांत आदिवासी संशोधनाला गती; आदिवासी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संधी वाढणार-उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील

प्रतिनिधी १३ मे

**अमरावती :** राज्यातील आदिवासीबहुल क्षेत्रातील विद्यापीठांमध्ये आदिवासी अध्ययन, संशोधन आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी आदिवासी अध्यासन केंद्र सुरू करण्यात येणार आहे. राज्यातील विद्यापीठांमध्ये आदिवासी अध्ययन व संशोधनाला या निर्णयांमुळे गती मिळणार असून, त्याचा थेट लाभ आदिवासी विद्यार्थ्यांना होणार आहे. या उपक्रमामुळे आदिवासी विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षणाच्या संधी वाढणार असल्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी सांगितले.

मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासी अध्यासन केंद्रांना निधी उपलब्ध करणेबाबत मंत्रालयात बैठक झाली. या बैठकीस

आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, आदिवासी विकास विभागाचे सहसचिव मच्छिंद्र शेळके, मुंबई, जळगाव, नांदेड, अमरावती, गडचिरोली विद्यापीठाचे कुलगुरू उपस्थित होते.

मंत्री चंद्रकांत दादा पाटील म्हणाले, जळगाव, नांदेड व मुंबई विद्यापीठात आदिवासी अध्यासन केंद्र कार्यरत असून अमरावती व गडचिरोली विद्यापीठात नव्याने आदिवासी अध्यासन केंद्र सुरु करण्यात येणार आहेत. या विद्यापीठाला आदिवासी अध्ययन केंद्रासाठी ३ कोटी रुपयांचा निधी आदिवासी विकास विभागाकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या निधीतून केंद्रांची उभारणी, संशोधन उपक्रम आणि विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शैक्षणिक सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. आदिवासी समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक विकासासाठी संशोधनाधारित उपक्रमांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. महाराष्ट्रातील आदिवासी जमातींची समृद्ध लोकसंस्कृती, भाषा आणि परंपरा जतन करणे तसेच त्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी संशोधन करणे हा या केंद्रांचा मुख्य उद्देश आहे. यामार्फत आदिवासी समाजाचा इतिहास पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शैक्षणिक आणि संशोधनात्मक उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी सांगितले. मंत्री डॉ. अशोक वुईके म्हणाले, आदिवासी अध्यासन केंद्र च्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या पारंपरिक ज्ञान, संस्कृती आणि जीवनशैलीचा अभ्यास होऊन त्याचे जतन करण्यास मदत होणार आहे. तसेच, शिक्षण आणि संशोधनाच्या माध्यमातून आदिवासी युवकांना नवीन संधी उपलब्ध होऊन त्यांचा सर्वांगीण विकास साध्य होण्यास मदत होईल.

आदिवासी विद्यार्थ्यांचा उच्च व तंत्र शिक्षणातील सहभाग वाढविणे आणि त्यांना रोजगारक्षम बनविणे हेही या केंद्रांचे प्रमुख उद्दिष्ट राहणार आहे.

# इर्विन चौकात कोणार्क कंपनीच्या कर्मचाऱ्यांचे आंदोलन; उपमहापौर सचिन भेंडे यांनी दिली भेट

प्रतिनिधी १३ मे

**अमरावती:** अमरावती महानगरपालिका अंतर्गत कार्यरत कोणार्क कंपनीचे वाहन चालक व मदतनीस यांनी विविध प्रलंबित मागण्यांसाठी इर्विन चौक येथे आंदोलन सुरू केले आहे. आंदोलनात मोठ्या संख्येने कर्मचारी सहभागी झाले असून आपल्या मागण्यांकडे प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे.



दरम्यान, आंदोलनस्थळी सचिन भेंडे यांनी भेट देत आंदोलक कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी कर्मचाऱ्यांनी आपल्या अडचणी व समस्या उपमहापौर सचिन भेंडे यांच्या समोर मांडल्या. संबंधित प्रश्नांबाबत प्रशासनाशी चर्चा करून योग्य तो तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन उपमहापौर सचिन भेंडे यांनी दिले. यावेळी बोलताना उपमहापौर सचिन भेंडे म्हणाले की, अमरावती शहरात स्वच्छतेबाबत अनेक समस्या निर्माण झाल्या असून त्या सोडविण्यासाठी तसेच अमरावती शहर आपल असून आपला वाटा मोलाचा आहे. शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी सर्व कर्मचारी, वाहन चालक व मदतनीस यांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच स्वच्छता व्यवस्थेतील अडचणी दूर करून नागरिकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिका प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
बुधवार दि १३ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com



# रमेश टॉकीज खोदण्याचा करार, वाशीममध्ये गुप्तधनाच्या शोधाचा थरार!

*** पोलिसांची धाड ; ७ जण ताब्यात * 'या' टोळीत राजाश्रय असलेल्यांचा सहभाग *मेटल डिटेक्टर चा गुप्तधनाच्या शोधासाठी वापर**







● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

शहरातील अनेक वर्षापासुन बंद पडलेल्या रमेश टॉकीज परिसरात गुप्तधनाच्या शोधासाठी सुरू असलेल्या संशयास्पद खोदकामावर शहर पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने मंगळवारी सायंकाळी अचानक धाड टाकत ७ जणांना ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. या कारवाईमुळे शहरात एकच खळबळ उडाली असून गुप्तधन काढण्याच्या प्रकरणात काही राजकीय आणि प्रतिष्ठित व्यक्तींची नावेही पुढे येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र पोलीस आता या लोकांवर हात टाकणार का ? हे पाहणे आता महत्वाचे ठरणार आहे.

शहरातील लोकमान्य टिळक भवन ट्रस्टच्या नावाने असलेल्या आणि मागील अनेक वर्षापासून बंद अवस्थेत पडलेल्या रमेश टॉकीज मध्ये गेल्या काही दिवसांपासून गुप्तधनाच्या शोधासाठी खोदकाम सुरू असल्याच्या चर्चा सुरू होत्या. या संदर्भात मिळालेल्या गुप्त माहितीनंतर शहर पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने मंगळवारी सायंकाळी सहा वाजताच्या सुमारास अचानक या ठिकाणी धाड टाकली. दरम्यान पोलिसांनी घटनास्थळावरून ७ जणांना ताब्यात घेत चौकशीसाठी पोलीस ठाण्यात आणले आहे. या कारवाई दरम्यान गुप्तधन शोधण्यासाठी वापरले जाणारे 'मेटल डिटेक्टर' मशीनही पोलिसांनी जप्त केली आली आहे. ताब्यात घेतलेल्या व्यक्तींची रात्री उशिरापर्यंत कसून चौकशी सुरू होती. मात्र या संपूर्ण प्रकरणाबाबत पोलीस प्रशासनाकडून अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. परंतु या कारवाईनंतर शहरात विविध चर्चांना उधाण आले असून या प्रकरणात मोठ्या राजकीय पक्षाशी संबंधित काही व्यक्तींची नावे पुढे येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे आता पोलिस तपासातून नेमके काय समोर येते. याकडे संपूर्ण शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

## पोलीसांनी सात जणांना घेतले ताब्यात

शहरातील बहुचर्चित बंद असलेल्या रमेश टॉकीज परिसरात मेटल डिटेक्टरचा वापर करून गुप्तधन काढणाऱ्या 'सुवर्ण' टोळीतील सात जणांना मंगळवारी सायंकाळी शहर पोलीसांनी ताब्यात घेतले. यामध्ये सतीश बकाले, महेश दायमा, सुमन कुंभार (बिहार), संतोष गाभणे, महादेव कांबळे, सुनील डाखोरे, रंजित गायकवाड यांचा समावेश आहे. मास्टरमाईंड असलेले कर्तेधर्ते फरार असल्याची शहरात चर्चा आहे.

## गुप्तधन शोधण्यासाठी महत्वाची भूमिका बजावणारे 'ते चार' राजकीय व्यक्ती कोण, कोणाचे आले फोन...

वाशीम शहरातील रमेश टॉकीज मध्ये जेव्हा खोदकाम करून गुप्तधन शोधण्याचे काम सुरू होते .तेव्हा त्या ठिकाणी अनेक जण हजर असल्याची माहिती आहे .मात्र पोलिस आल्याची चाहूल लागताच काही जण पळून जाण्यात यशस्वी झाले.त्या पैकी ७ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले.परंतु या प्रकरणात मास्टरमाईंड असलेल्या 'चार' जणांची भूमिका महत्वाची असल्याची चर्चा आहे. त्यामध्ये एक तर माजी आमदाराचा पी.ए.असून दुसरा एका मोठ्या राजकीय पक्षाचा माजी शहर अध्यक्ष असल्याचे समजते..तर तिसरा लंगडा घोडा असून त्याची पोहोच मंत्रालयापर्यंत असल्याची चर्चा आहे.अन् चौथा खूप मास्टर माईंड मानला जात असून त्याची राजकीय पकड मजबूत असल्याचे समजते. त्यामुळे पोलीस या चौघांपर्यंत पोहचून हे प्रकरण नेमकं काय आहे. हे उघडकीस आणणार का ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## टिळक भवनाला समाजसेवेचा आरसा, 'त्या' जागेला ऐतिहासीक 'वारसा'...

वत्सगुल्म नगरीमध्ये मंगळवारी सायंकाळी गुप्तधन काढण्याच्या प्रकाराने चर्चेत आलेल्या लोकमान्य टिळक भवन ट्रस्ट च्या जागेमध्ये व परिसरामध्ये राजे वाकाटकांचा राजवाडा होता.त्या परिसरातील राजवाड्याचे काही भग्न अवशेषही वाकाटकांच्या समृद्धशाली, वैभवशाली राजवटीचे साक्षीदार म्हणून अखेरच्या घटका मोजत होते.हा भाग रमेश टॉकीज च्या पाठीमागेच होता.या भागातही गुप्तधन काढण्यासाठी अनेक जणांनी प्रयत्न केल्याची 'त्या' परिसरातील नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे.ही जागा लोकमान्य टिळक स्मारक भवन ट्रस्ट च्या नावाने असून या जागेत दरवर्षी गणेशोत्सव काळामध्ये सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. ही ट्रस्ट राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी निगडीत असलेल्या लोकांची असून सर्व ट्रस्टींना राजाश्रय असल्याचे समजते. या जागेमध्ये मोठ्या प्रमाणात गुप्तधन असल्याची चर्चा असून 'ते' गुप्तधन काढण्यासाठी या प्रकरणातील मास्टरमाईंड गुप्तधन शोधणाऱ्या लोकांच्या संपर्कात होते, अशीही चर्चा शहरात सुरू आहे.

# पर्यावरण वाचविण्याच्या लढ्याची तीव्र होणार निती, झाडतोडीला उच्च न्यायालयाची स्थगिती !

**१०९ झाडांसाठीचा लढा ठरला ऐतिहासिक; सागर कोकासच्या लढ्याला यश**







● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

राष्ट्रीय महामार्ग १६१ वरील बेकायदेशीर झाडतोडीविरोधात सुरू करण्यात आलेल्या संघर्षाला मोठे यश मिळाले असून न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे तब्बल १०९ झाडांचे संरक्षण करण्यात यश आले आहे. पर्यावरण रक्षणासाठी लढणाऱ्या नागरिकांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे हा ऐतिहासिक निर्णय शक्य झाला. विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल सुरू असल्याची माहिती समोर आल्यानंतर पर्यावरणप्रेमींनी याविरोधात सामाजिक कार्यकर्ते सागर कोकास यांनी आवाज उठवला होता. न्यायालयाने स्थगिती दिल्याने पर्यावरण वाचविण्याच्या आंदोलनाला गती मिळणार आहे.



अनेक अडथळे, प्रशासनिक दबाव आणि कायदेशीर प्रक्रियेतील गुंतागुंत यांचा सामना करत हा लढा निर्धाराने पुढे नेण्यात आला. या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालय येथे याचिका दाखल करण्यात आली होती. ॲड.मोहन गवई यांनी न्यायालयात प्रभावी बाजू मांडल्यानंतर न्यायालयाने बेकायदेशीर झाडतोडीवर स्थगिती आदेश देत १०९ झाडांचे संरक्षण करण्याचे निर्देश दिले. हा निर्णय केवळ काही झाडांचे रक्षण नसून पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने मिळालेला मोठा विजय मानला जात आहे. जनतेची एकजूट, कायद्यावरील विश्वास आणि निसर्गावरील प्रेम यामुळे अन्यायाविरोधातील हा संघर्ष यशस्वी ठरला. या लढ्यात योगदान देणाऱ्या सर्व पर्यावरणप्रेमी, सहकारी, नागरिक आणि न्यायव्यवस्थेचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. भविष्यातही पर्यावरण रक्षणासाठी अशाच प्रकारे जनजागृती आणि संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. 'झाडे वाचली तरच भविष्य वाचेल' हा संदेश देणारा हा संघर्ष अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# महसूल विभागात अनागोंदी, गैरप्रकारे घेतल्या फेरफार नोंदी... नाही खंत, भ्रष्टाचाराचा अंत, मृत व्यक्ती जिवंत !

**धक्कादायक गैरप्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची गरज**



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यातील रिसोड तहसील अंतर्गत येत असलेल्या एका गावातील फेरफार व वारस नोंदी मध्ये मोठा गैरप्रकार झाला असल्याची माहिती हाती आली आहे. सन २००८ मध्ये घेतलेल्या एका फेरफारवरची नायब तहसीलदार यांची स्वाक्षरी व्हाइटनरने खोडाखाड करण्यात आल्याचे स्पष्ट होत असल्याने सदर फेरफार नोंद बनावट असल्याचे समोर येत आहे. शिवाय हा फेरफार नोंद घेण्याआधी जिवंत व्यक्तीला मयत दाखविण्यात आले असल्याची खळबळजनक माहितीही सबंधित व्यक्तीच्या नातेवाईकांकडून चर्चिल्या जात आहे. या प्रकरणामुळे महसूल विभागातील भ्रष्ट कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर येत असून रिसोड तहसील प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे बापदादांच्या स्थावर मालमत्तेसाठी जिवंत व्यक्तीस मयत दाखवणे हा महसूल विभागासाठी नाचक्की ठरणारा प्रकार आहे अशी चर्चा आता जिल्हाभर होत आहे. परिणामी जिल्हाधिकाऱ्यांनी अशा प्रकरणाची गंभीर दखल घेऊन संपूर्ण जिल्ह्यातील वारस नोंदीची सखोल चौकशी व तपासणी करावी अशी मागणी होत आहे.

रिसोड तालुक्यातील शेलुखडसे शेतशीवारातील तत्कालीन शेतसर्व्हे नंबर व आजमितीस असलेल्या गट नंबर मधील एक फेरफार नोंद बनावट असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. वडिलोपार्जित असलेल्या जमिनीतून बहिणीचा पत्ता कट करण्यासाठी सदर कटकारस्थान करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. शिवाय वडिलोपार्जित स्थावर व जंगम मालमत्तेत बहिणीचा हिस्सा पडू नये यासाठी जिवंत बहिणीला मयत दाखवून वारसाची नोंद प्रमाणित करण्यात आली असल्याची चर्चा जनसामान्याकडून ऐकावयास मिळत आहे. सदर गंभीर प्रकाराची चर्चा एकूण येथील एका सामाजिक कार्यकर्त्याने पडताळणी व्हावी म्हणून तहसील कार्यालयातून वारस नोंदीचे फेरफार व ईतर दस्तऐवज छायांकित प्रतीत काढले असता ही धक्कादायक माहिती पुढे आली आहे. या खळबळजनक प्रकरणात कौटुंबिक संबंधातून कुठलाही वाद न्यायप्रविष्ठ झाला नसला तरी हा गंभीर प्रकार समाजातील ईतर अनेक माता भगिनींच्या संविधानिक हक्कावर गडांतर आणणारा ठरत आहे. शिवाय महसूल मंत्रालयाच्या पारदर्शकतेवर प्रश्चिन्ह निर्माण करणारा आहे. परिणामी असेच गंभीर व लज्जास्पद प्रकार भविष्यात घडत राहिले तर अनेक महिलांचे आयुष्यच आधांतरी लटकणार अशी भीती तज्ञांकडून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे या गंभीर प्रकाराची उच्चस्तरीय चौकशी व तपासणी करण्यात यावी अशी मागणी विशेषतः महिला मंडळाकडून करण्यात येत आहे.

## प्रशासनातील भ्रष्टाचार, सरकारच जबाबदार.

बेटी बचाओ बेटी पढाओ, महिला सक्षमीकरणासाठी सरकार कटिबद्ध अशा अनेक वल्गना आजपर्यंतच्या सर्वच सत्ताधाऱ्यांनी केल्या असल्याचे सर्वश्रुत आहे. त्यासाठी संविधानात तरतूद असलेल्या अनेक कायद्यांचा आधार घेत महिला विषयक धोरण आखले जात असल्याचा दावा प्रत्येक सरकारने केला आहे. प्रत्यक्षात मात्र भलतेच घडत असल्याचे या लज्जास्पद प्रकरणाने उजागर केले आहे. हा भ्रष्टाचार प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी करत असले तरी याला सत्ताधारी सरकारच जबाबदार ठरते हे निर्विवाद सत्य आहे. प्रशासनातील पारदर्शकता टिकून ठेवण्यासाठी कठोर भूमिका घेणे हे सत्ताधारी सरकारचे कर्तव्य आहे. प्रत्येक गंभीर प्रकाराची तक्रारच करण्यात यावी असा काही नियम नाही. अनेक माध्यमातून असे घाणेरडे प्रकार उघड होतात तेंव्हा शासनाने त्याची तातडीने दखल घेऊन सखोल चौकशी करावी आणि अशा गंभीर गैरप्रकारांना आळा बसवावा अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## सामाजिक हितासाठी सिटीन्यूज सुपरफास्टचा लढा सुरूच...

सामाजिक अन्याय, अत्याचार व महिलांचे प्रश्न आणि शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी सिटीन्यूज सुपरफास्ट नेहमीच पुढाकार घेत आहे. याआधी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अर्थात पोकरा मधील कथित गैरप्रकार सिटीन्युज सुपरफास्टने सातत्याने उघड केले आहेत. शैक्षणिक क्षेत्रातील भ्रष्टाचार असो, किंवा नागरी सुविधांचा अभाव असो सिटीन्यूज सुपरफास्टकडून पुराव्यानिशी पाठपुरावा करण्यात आला आहे. महसूल विभागातील बनावट फेरफार व बोगस नोंदी विषयी सिटीन्यूज सुपरफास्टकडे पुरावे आले असून जो पर्यंत प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी आणि महसूल मंत्रालय या गंभीर प्रकाराची गांभीर्याने दाखल घेणार नाही तो पर्यंत सिटीन्यूज सुपरफास्टचा हा लढा सुरूच राहणार आहे.

महसूल विभाग

# यंदा पाऊस कमी तरीही शेतकरी मालामाल - पंजाबराव डख

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

यंदाच्या वर्षात पावसाचे प्रमाण तुलनेने कमी राहण्याची शक्यता असली, तरी योग्य नियोजन, पिकांची फेरपालट आणि वेळेवर शेती व्यवस्थापन केल्यास शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होणार असून २०२६ हे वर्ष शेतकऱ्यांसाठी मालामाल करणारे ठरेल, असा विश्वास हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी व्यक्त केला. लोकनेते माजी आमदार स्व.प्रकाशदादा डहाके यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कृषी उत्पन्न बाजार समिती, कारंजा यांच्या वतीने १० मे रोजी यार्ड क्रमांक १ येथे आयोजित शेतकरी मार्गदर्शन कार्यशाळेत ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.



कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात माजी आमदार स्व.प्रकाशदादा डहाके यांना आदरांजली वाहण्यात आली. अध्यक्षस्थानी भाजपाचे मुख्य प्रतोद आ.रणधीर सावरकर होते. यावेळी उद्घाटक म्हणून खा. अनुप धोत्रे, तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार अनंतराव देशमुख, आ.सईताई डहाके, आ.श्याम खोडे, माजी आ.विजयराव जाधव, भाजप जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे, जिल्हा सरचिटणीस डॉ.राजीव काळे, वाशिम नगराध्यक्ष अनिल केंदळे, माजी नगराध्यक्ष दत्तराज डहाके, जिल्हा कृषी अधिकारी आरिफशा, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक विश्वनाथ ताथोड, गटनेत्या शालिनी ठाकरे, नगरसेवक सागर अंभोरे, अतुल चिमेगावे, नगरसेविका वैशाली गुल्हाने, कांचन डेंडूळे, ज्योती राठोड, वंदना धार्डीकर, कुसुमताई अघम, नितीन गढवाले, अजय श्रीवास यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्व.प्रकाशदादा डहाके यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर माजी आमदार जाधव, आमदार खोडे, खासदार अनुप धोत्रे आदी मान्यवरांनी माजी आ.स्व.प्रकाश डहाके यांच्या संबंधीच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी माजी खासदार अनंतराव देशमुख यांनी स्व.प्रकाशदादा डहाके यांच्या कार्याचा गौरव करताना, खरं बोलूनही राजकारणात माणसे जोडता येतात, याचे ते जिवंत उदाहरण होते, असे सांगितले. तर आ.सईताई डहाके यांनी बाजार समितीमार्फत राबविण्यात येणाऱ्या शेतकरी हिताच्या उपक्रमांची माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात आ.रणधीर सावरकर यांनी पीक विमा कंपन्यांच्या गैरप्रकारांना आळा घालून शेतकरी हितासाठी निधी वापरण्याचे शासनाचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले. तसेच शेतीत विज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवून कृषी क्षेत्रात अधिक गुंतवणूक करण्याचे धोरण शासनाने ठरविले असल्याचे स्पष्ट केले. सहकार संस्थांचे जाळे अधिक मजबूत करण्याची गरज व्यक्त करत त्यांनी शेतकऱ्यांनी पूरक उद्योग आणि व्यवसायांकडेही वळावे, असे आवाहन केले. प्रास्ताविक बाजार समितीचे उपसभापती प्रकाश लिंगाटे यांनी केले. सूत्रसंचालन प्रवीण कानकिरड तर आभारप्रदर्शन सचिव निलेश भाकरे यांनी केले. कार्यशाळेला कारंजा तालुक्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान माती परीक्षण प्रयोगशाळेचे उद्घाटन करण्यात आले. तसेच बाजार समितीकडून शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्याचे धनादेश वितरित करण्यात आले आणि कृषी विभागामार्फत ट्रॅक्टर वाटपही करण्यात आले.

## शेतकरी कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

# कडक उन्हाळा, आरोग्य संभाळा !

**उष्माघातापासून बचावासाठी जिल्हा प्रशासनाचे आवाहन**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



भारतीय हवामान खात्याद्वारे निर्गमित संदेशानुसार, १२ ते १४ मे २०२६ दरम्यान जिल्ह्यात तुरळक ठिकाणी उष्मालाटेची शक्यता वर्तविण्यात आलेली असून 'यलो अलर्ट' जारी करण्यात आलेला आहे. या पार्श्वभूमीवर उष्माघाताचे मानव व पशू-प्राणी यांच्यावरील दुष्परिणाम टाळण्यासाठी नागरिकांनी योग्य ती दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

प्रशासनाने नागरिकांना खालीलप्रमाणे दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या आहेत : नागरिकांनी काय करावे तहान लागली नसेल तरीही दर अर्ध्या तासाच्या फरकाने पुरेसे पाणी प्यावे.- शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओ.आर.एस. घ्यावे, तसेच घरी तयार करण्यात आलेली लस्सी, ताक, कैरीचे पन्हे, लिंबू पाणी इत्यादींचा नियमित वापर करावा.- घराबाहेर पडताना डोके झाकण्यासाठी छत्री अथवा टोपीचा वापर करावा.- तसेच ओल्या कपड्यांनी डोके, मान व चेहरा झाकण्यात यावा.- प्रवासात पिण्याचे पाणी सोबत ठेवावे.- उन्हापासून बचाव करण्यासाठी हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत.- घरे थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर व सनशेडचा वापर करावा आणि रात्री खिडक्या उघड्या ठेवाव्यात.- पंखे, ओले कपडे यांचा वापर करावा व थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करावे.- अशक्तपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम ही उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखून चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

# लोकअदालतीमध्ये दाखलपुर्व 438 व प्रलंबित 351 प्रकरणांचा निपटारा!

प्रतिनिधी १३ मे

## १६ कोटी २५ हजारांचे तडजोड शुल्क वसूल!



**बुलढाणा:** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या आदेशान्वये जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बुलढाणा तथा वकील संघाच्या संयुक्त विद्यमाने ९ मे रोजी जिल्ह्यातील सर्व न्यायालयात राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मोटार अपघात प्रकरणामध्ये १ कोटी २१ लाख २५ हजार रुपये तडजोडीने अदा करण्यात आले. तर ७८९ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून त्यापोटी १६ कोटी २५ लक्ष १९ हजार २०७ रुपयांचा तडजोड शुल्क वसूल करण्यात आला.

जिल्हा न्यायालय बुलढाणा येथे ९ मे रोजी आयोजीत राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये बँक, ग्रामपंचायत, नगर परिषद तसेच भारतीय दुरसंचार निगम तसेच राज्य विद्युत वितरण कंपनी यांचे दाखलपूर्व ५१ हजार ४९५ प्रकरणे दाखल असलेल्या प्रकरणातील ११ हजार ७३८ प्रकरणी ठेवण्यात आली होती त्यापैकी ३५१ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून त्यापोटी १६ कोटी ३ लाख ५४ हजार १६७ तडजोड शुल्क वसूल करण्यात आले. बँक, ग्रामपंचायत, नगर परिषद, भारतीय दूरसंचार निगम आणि विघुत वितरण कंपनी यांचे दाखलपूर्व ११, ७८० दाखल प्रकरणपैकी ४३८ प्रकरणे निकाली काढण्यात आली, त्यापोटी २६ लाख ६५ हजार ४० दंड अशाप्रकारे जिल्ह्यात २३,५१८ प्रकरणापैकी ७८९ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून त्यापोटी १६ कोटी २५ लाख १९ हजार २०७ रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बुलढाणा एस.डी.जगमलानी यांच्या मार्गदर्शनाखाली शेख अकबर शेख जाफर बुलढाणा जिल्हा न्यायाधिश -१, जिल्हा न्यायाधिश-२ तथा अति.सत्र न्यायाधीश ए.जी.संतानी, सत्र न्यायाधिश एस.ई.घोरपडे, निवृत्त न्यायाधिश श्रीमती पी.ए.खंडारे ४ थे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठस्तर बुलढाणा असे एकूण ३ पॅनल व १ विशेष न्यायालय कार्यरत होते. सदर पॅनलवर ॲड. वाय. वाय. जाधव, ॲड. संदीप पांचाळ, ॲड. डी.पी.गोठी यांनी सहाय्यक पंच म्हणून काम पाहिले. जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. विजय सावळे व सर्व विधिज्ञांनी राष्ट्रीय लोकअदालत यशस्वीतेसाठी योगदान दिले.

जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. विजय सावळे व सर्व विधिज्ञांनी राष्ट्रीय लोकअदालत यशस्वीतेसाठी योगदान दिले. तर राष्ट्रीय लोक अदालतीचे यशस्वीतेसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बुलढाणा सचिव नितीन पाटील, जिल्हा न्यायाधिश-१ शेख अकबर शेख जाफर, जिल्हा न्यायाधिश-२ तथा अति.सत्र न्यायाधिश बुलढाणा व जिल्ह्याचे वकील संघाचे विधीज्ञ, बँकांचे अधिकारी व कर्मचारी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बुलढाणा व जिल्हा न्यायालय कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# संवेदनशील भागात महिला व मुलींची छेडखानी!

प्रतिनिधी १३ मे

## सिसिटीव्ही कॅमेरे लावावे; महिलांचे निवेदन



**खामगाव:** स्थानिक निर्मल टर्निंग परिसरात टवाळखोरांचा उच्छाद वाढला असून मुलींची छेडखानी केल्या जात आहे. त्यामुळेच या भागात दोन दिवसाअगोदर दगडफेक होवून तणाव निर्माण झाला होता. त्यामुळे या भागात पोलीस विभागाने तातडीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे, अशी मागणी परिसरातील नगरसेविका आणि महिला मुलींनी शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे निवेदनाव्दारे केली आहे.

स्थानिक शिवाजी नगर भागातील महिलांनी ११ मे रोजी सायंकाळी प्रसाद ओंकार आप्पा तोडकर यांच्या मार्गदर्शनात शिवाजी नगर पोस्टे ठाणेदार यांना निवेदन दिले. त्यामध्ये अशा आशयाचे नमुद केले आहे की, निर्मल टर्निंगजवळ ८ मे रोजी झालेल्या वादामुळे शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. सदर भाग संवेदनशील म्हणुन ओळखला जातो. तर या भागात वाईट उद्देशाने टोळके नेहमी बसलेले असतात व विवाहित महिला व मुर्तीची छेड काढण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यामुळे महिलांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. महिला कामावरून परत घरी येईपर्यंत कुटुंबियांमध्ये धाकधूक राहते. महिला व मुलींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलिस विभागाच्या वतीने निर्मल टर्निंग, मरकज मस्जिद आदि तसेच संवेदनशील ठिकाणी सिसिटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावे. पोलिसांची ड्युटी लावण्यात यावी, अशी मागणी निवेदनात केली आहे. निवेदनावर स्नेहल गरड, रेखा जाधव, रूपाली मुळीक, लता गरड, निर्मला वाघ, चैताली फंड, शितल फंड, अनिता पाडोळे, प्रिती सुदाम पाडोळे, ज्योती पंकज चव्हाण आदी महिला व तरूणींच्या सह्या आहेत.

# सुटाळा बु. येथील योग-प्राणायाम शिबिराला नागरिकांचा प्रतिसाद!

प्रतिनिधी १३ मे

## पतंजली योग समिती व ग्रामस्थांच्या वतीने आयोजन

**खामगाव:** सुटाळा बु येथे पतंजली योग समिती व समस्त ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेले निशुल्क योग-प्राणायाम शिबिर ६ ते १० मे या कालावधीत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. शिबिराला नागरिकांचा मोठ्या संख्येने मिळाला. प्रतिसाद

जि. प. कन्या शाळेत आयोजित या शिबिराचा समारोप रविवार, १० मे रोजी झाला. योग शिक्षक राजेंद्रसिंह राजपूत यांनी शिबिरात विविध योगासने, प्राणायाम तसेच आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. समारोप कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तालुका संघचालक संतोष देशमुख उपस्थित होते. यावेळी शेगाव येथील सुलताने, शोभा बाळापुरे यांचा सत्कार करण्यात आला. किसान सभा राज्य प्रभारीपदी नियुक्ती झाल्याबद्दल नीलकंठ साबळे यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास पतंजली तालुका प्रभारी भिकाजी रेठेकर, तालुका युवा प्रभारी अमित जोशी तसेच सदावर्ते यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिरात सहभागी झालेल्या सर्व साधकांना प्रमाणपत्रांचे वितरण केले. समारोपप्रसंगी सुभाष जवळकार यांच्या वतीने सहभागींसाठी खाऊचे वितरण करण्यात आले, तर भगवान होनाळे यांनी पेनचे वाटप केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी जि. प. कन्याशाळा, जनसेवा किराणा तसेच योग सेवा समितीचे वासुदेव भोपळे, गजानन कऱ्हाळे, संतोष बगाडे, मंगेश भोपळे, शिवा देशमुख, गजानन कंटाळे, गजानन वानखडे, प्रसाद वावगे, बजरंग, राहुल पाटील, अजय आढाव, जय राजपूत यांच्यासह सर्व पदाधिकारी, सदस्य व ग्रामस्थांनी सहकार्य केले.

# ग्राम दाताळ्यात चाकूचा धाक दाखवून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

प्रतिनिधी १३ मे

## मलकापुर ग्रा.पो.स्टेत गुन्हा दाखल

**मलकापुर:** माणुसकीला काळिमा फासणारी एक अत्यंत संतापजनक घटना मलकापूर ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या दाताळा परिसरातून समोर आली आहे. घराचे बांधकाम सुरू असताना ओळख निर्माण करून, एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीवर चाकूचा धाक दाखवून वारंवार अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी मुख्य आरोपीसह त्याला साथ देणाऱ्या एकूण तीन जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पिडीत मुलगी (वय १६ वर्ष १० महिने) ही दाताळा येथे वास्तव्यास असून ती ८ वी मध्ये शिक्षण घेत आहे. सन २०२५ मध्ये पिडीतेच्या घराचे बांधकाम सुरू होते. या कामादरम्यान आरोपी तोफीख शाह अताउल्हा शाह उर्फ शाहरुख (रा. पारपेठ, मलकापूर) हा वारंवार पिडीतेच्या घरी येत असे. याच काळात त्याची पिडीत मुलीशी ओळख झाली. डिसेंबर २०२५ मध्ये पिडीतेचे आई-वडील घरी नसताना ती घराबाहेर उभी होती. यावेळी आरोपी तोफीख शाह अताउल्हा शाह, मुज्जु शाह साबीर शाह आणि शाकीर शाह हे तिघे तिथे आले. मुज्जु आणि शाकीर हे घराबाहेर पाळत ठेवून उभे राहिले, तर मुख्य आरोपी तोफीख याने पिडीतेचा हात धरून तिला बळजबरीने ओढत घराच्या आत नेले. तिथे त्याने पिडीतेच्या इच्छेविरुद्ध तिच्यावर अत्याचार केला.

### कुटुंबाला संपवण्याची धमकी

अत्याचार केल्यानंतर नराधम तोफीख इथेच थांबला नाही. त्याने पिडीतेच्या गळ्याला चाकू लावून तिला जीवे मारण्याची धमकी दिली. जर हा प्रकार तुझ्या आई-वडिलांना किंवा भावाला सांगितला, तर त्यांना एखाद्या दिवशी जिवाने मारून टाकीन, अशी भीती घातल्यामुळे पिडीत मुलगी प्रचंड दहशतीत होती. याच भीतीचा फायदा घेत जानेवारी २०२६ मध्येही आरोपीने पुन्हा तिच्यावर अत्याचार केला. डिसेंबर २०२५ ते जानेवारी २०२६ या काळात आरोपीने वारंवार तिचे शारीरिक शोषण केले. सततच्या जाचाला आणि दहशतीला कंटाळून अखेर पिडीतेने हिंमत एकवटून ११ मे २०२५ रोजी सायंकाळी मलकापूर ग्रामीण पोलीस स्टेशन गाठले आणि आपबिती सांगितली. तिच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी तोफीख शाह अताउल्हा शाह उर्फ शाहरुख (रा. पारपेठ, मलकापूर), मुज्जु शाह साबीर शाह (रा.बुलडाणा, ह. मु. पारपेठ, मलकापूर), शाकीर शाह (रा. मुस्ताक अली नगर, मलकापूर) याच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिताचे कलम ६४(१), ६४ (२)(ड), ७० (२), ३५१(२) (३), ३(५) आणि पोक्सो कायदा कलम ४, ६, ८, १२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रशांत राठोड है करत आहेत. या घटनेमुळे दाताळा परिसरात संतापाची लाट उसळली असून, नराधमांना फाशीची शिक्षा देण्याची मागणी होत आहे.

# भूमी अभिलेख कार्यालयातील दोन कर्मचाऱ्यांवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कार्यवाही

प्रतिनिधी १३ मे

**जळगाव (जामोद):** १२ भूखंड मोजणी अर्जात त्रुटी आल्यामुळे तुमचा अर्ज रद्द केल्या जाऊ शकतो, जर तुम्हाला त्रुटी काढायचे असतील आणि लवकर मोजणी करायची असेल तर तुम्ही दहा हजार रुपये द्यावी अशी मागणी करणारे जळगाव जामोद भूमी अभिलेख कार्यालयातील दोन कर्मचाऱ्यांवर पडताळणीअंती बुलढाणा लाच लूजपत प्रतिबंधक विभागाने सापळा रतन दिनांक १२मे रोजी यशस्वी कारवाई केली.

तक्रारदाराने आपल्या वडिलांचे नावे असलेल्या भूखंडाची शासकीय फी भरून दिनांक १६ जानेवारी रोजी ऑनलाईन नोंदणी केली. त्यानंतर १७ जानेवारी रोजी ते उपाधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालयातील परिरक्षक भूमापक विश्वजीत सोनवणे यांना भेटले. अर्जामध्ये त्रुटी असून त्यासाठी तुम्हाला दहा हजार रुपये द्यावे लागतील ,असे सोनवणे यांनी तक्रार करता सांगितले. त्यानंतर लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रारकर्त्यांनी रीतसर तक्रार केली. १७ जानेवारी रोजी लाचेची मागणी कारवाही पडताळणी करण्यात आली. त्यावेळेस तक्रार करते सोनवणे यांना भेटले असता त्यांनी मुख्यालय सहाय्यक सचिन वाजपे यांना भेटण्याचे सांगितले. भूमापक सोनवणे यांना मोजणी करण्यासाठी तुम्हाला दहा हजार रुपये द्यावे लागतील असा सल्ला परत सहायक सचिन वाजपे यांनी तक्रार कर्त्यांना दिला.

लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक १२ मे रोजी सापळा रचून तालुका भूमि अभिलेख कार्यालयात प्रत्यक्ष लाचेची रक्कम दहा हजार रुपये स्वीकारताना परीक्षण भूमापक विश्वजीत सोनवणे आणि कार्यालयीन सहाय्यक सचिन वाजपे यांना रंगेहात पकडले. वृत्त लीहे पर्यंत कार्यवाही सुरू होती. संबंधित दोन्ही आरोपी विरुद्ध जळगाव जामोद पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ नुसार गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

सदर कार्यवाही बापू बांगर ,पोलीस अधीक्षक अँटी करप्शन ब्युरो अमरावती, तसेच सचिन शिंदे अप्पर पोलीस अधीक्षक अँटीकरप्शन ब्युरो अमरावती आणि भागोजी चोरमले उपअधीक्षक अँटीकरप्शन ब्युरो बुलढाणा यांचे मार्गदर्शनाखाली रमेश पवार आणि विलास घुशिंगे पोलीस निरीक्षक आणि सापळा पथकातील पोलीस हेड कॉन्स्टेबल दीपक जाधव ,अमोल झीने, पोलीस कॉन्स्टेबल शैलेश सोनवणे ,रणजीत व्यवहारे, पंढरी शेळके, नितीन शेटे आणि चालक अर्शद शेख यांनी सदर सापळा कार्यवाही मध्ये सहभाग नोंदविला.

# घरबसल्या देता येणार हयात प्रमाणपत्र

प्रतिनिधी १३ मे

**खामगाव:** संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील लाभार्थ्यांनी तात्काळ हयात प्रमाणपत्र (डिजिटल लाइफ सर्टिफिकेट) अद्ययावत करून घ्यावे, अन्यथा जून महिन्यापासून संबंधित योजनेचा लाभ बंद करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. तहसिलदार सुनिल पाटील यांनी तालुक्यातील सर्व लाभार्थ्यांना या प्रक्रियेची गांभीर्याने दखल घेण्याचे आवाहन केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय क्रमांक केपुयो-२०२६/प्र. क्र.४२/विसयो दि. ७ मे २०२६ नुसार ही नवी प्रक्रिया लागू करण्यात आली आहे. आता eBneficiarySatyapan App द्वारे हयात प्रमाणपत्र ऑनलाईन पद्धतीने सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

सदर शासन निर्णयानुसार, लाभार्थ्यांना स्वतःच्या मोबाईलद्वारे किंवा नातेवाईकांच्या मदतीने ही प्रक्रिया निशुल्क पूर्ण करता येणार आहे. तसेच ग्राम महसूल अधिकारी (तलाठी), ग्राम महसूल सेवक (कोतवाल), ग्रामपंचायत कर्मचारी, सेतू सेवा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र किंवा नागरी सेवा केंद्र यांच्या माध्यमातूनही हयात प्रमाणपत्र ऑनलाईन सादर करता येणार आहे.

### प्रक्रिया कशी पूर्ण करावी?

डिजिटल हयात प्रमाणपत्र तयार करण्यासाठी लाभार्थ्यांनी खालीलप्रमाणे कृती करावीः

**ॲप डाऊनलोड:** लाभार्थ्यांनी प्ले स्टोअरवरून 'eBneficiary Satyapan App' आणि 'Aadhar Face RD' हे दोन ॲप डाऊनलोड करावेत.

**नोंदणी:** मोबाईल क्रमांक व आधार क्रमांकाद्वारे ॲपमध्ये नोंदणी करावी,

**योजना निवड:** लाभार्थी ज्या योजनेचा लाभ घेत आहेत, ती निवडून 'हिर्ग्मिब्‌ न्रिर्ग्मिदह' या पर्यायावर क्लिक करावे.

**पडताळणी:** चेहरा ओळख (फेस कॅप्चर) किंवा बोटांच्या ठशांद्वारे (finger print/ Iris) पडताळणी पूर्ण करावी. प्रमाणपत्र प्रक्रिया पूर्ण झाल्यावर डिजिटल हयात प्रमाणपत्र डाऊनलोड करता येईल.

शासनाच्या नव्या निर्देशांनुसार सर्व पात्र लाभार्थ्यांनी तातडीने ही प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. अनेक लाभार्थ्यांना तांत्रिक बाबींबाबत अडचणी येण्याची शक्यता लक्षात घेता प्रशासनाने गावपातळीवर मदतीची व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे त्यासाठी लाभार्थ्यांनी वेळ न दवडता संबंधित तलाठी, कोतवाल किंवा तहसिल कार्यालयातील संगायो शाखेशी संपर्क साधावा.

दरम्यान, विहित मुदतीत हयात प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या लाभार्थ्यांचा लाभ कोणतीही पुर्व सुचना न देता खंडीत करण्यात येवु शकते तरी लाभार्थ्यांनी मे २०२६ महिन्याच्या अखेर पर्यंत प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन खामगाव तहसिलदार सुनिल पाटील, यांनी केले आहे.

# सामाईक सातबारा असला, तरी सोलर कृषिपंपाचा मिळणार लाभ!

## इतर हिस्सेदारांच्या ना-हरकत प्रमाणपत्रासह करावी लागणार कागदपत्रांची पूर्तता!

प्रतिनिधी १३ मे

**सर्व भागीदारांची ना-हरकत प्रमाणपत्रे हवी!**
सामायिक सातबाऱ्यावर सौर कृषिपंपाचा लाभ घेण्यासाठी संबंधित जमिनीवरील सर्व भागीदारांची ना-हरकत प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक राहणार आहे. संयुक्त मालकीच्या जमिनीवर भविष्यात वाद निर्माण होऊ नयेत, तसेच योजनेचा लाभपारदर्शकपणे मिळावा यासाठी ही अट घालण्यात आली आहे.

**खामगाव:** खामगाव सततचा अनियमित वीजपुरवठा, वाढते वीजबिल आणि सिंचनासाठी होणारा अतिरिक्त खर्च यामुळे जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत. विशेषतः उन्हाळ्यात पिकांना पाणी देताना शेतकऱ्यांची मोठी कसरत होत असून, अनेकांना रात्रीच्या वेळी मोटार सुरू ठेवण्यासाठी शेतातच थांबावे लागते. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या 'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजनेकडे शेतकऱ्यांचा मोठा कल वाढत आहे. आता सामायिक सातबारा असलेल्या शेतकऱ्यांनाही या योजनेचा लाभमिळणार असल्याने हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. ग्रामीण भागात अनेक कुटुंबांची शेती ही संयुक्त मालकीची असल्याने सातबाऱ्यावर एकापेक्षा अधिक नावे असतात. त्यामुळे सौर कृषिपंपासाठी अर्ज करताना अनेकांना तांत्रिक व कायदेशीर अडचणींचा सामना करावा लागत होता; मात्र संबंधित जमिनीतील इतर हिस्सेदारांचे ना-हरकत प्रमाणपत्र व इतर कागदपत्रांची पूर्तता करावी लागेल संयुक्त किंवा सामायिक सातबाऱ्यावर शेती असलेल्या शेतकऱ्यांनाही सौर कृषीपंप योजनेचा लाभ घेता येणार आहे; मात्र त्यासाठी संबंधित जमिनीतील इतर हिस्सेदारांचे ना-हरकत प्रमाणपत्र आणि आवश्यक कायदेशीर कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहणार आहे. पूर्वी सामायिक शेती असलेल्यांना या योजनेचा लाभ मिळत नव्हता. त्यामुळे अडचण होती.शेतकऱ्यांना दिवसा अखंड वीज उपलब्ध करून सिंचन सुलभ व्हावे, यासाठी राज्य शासनाकडून 'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजना राबवली जाते. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना अनुदानावर सोलार पंप उपलब्ध करून दिले जातात. त्यामुळे विजेवरील खर्च कमी होण्यास मदत होते, तसेच रात्रीच्या सिंचनाची गरजही कमी होते. विशेषतः दुर्गम व भारनियमनग्रस्त भागातील शेतकऱ्यांसाठी ही योजना लाभदायक ठरत आहे.

# दहावी परीक्षेत महात्मा फुले विद्यालय शेगाव चा ९६.८७ टक्के निकाल

प्रतिनिधी १३ मे

**शेगाव:** माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा महात्मा फुले विद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले असून शाळेचा निकाल ९६.८७ज्ञ् इतका लागला आहे तसेच शेगाव शहरातून मराठी माध्यमांच्या शाळेमधून प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे.

शाळेमधील विद्यार्थी गणेश रवींद्र लोखंडे या विद्यार्थ्याने ८८.६०ज्ञ् गुण संपादन करून शाळेतून प्रथम येण्याचा मान मिळवला, हरीओम प्रमोद मसने या विद्यार्थ्याने ८८ज्ञ् व कु. भक्ती गोपाल वाढोकार हिने ८८ज्ञ् गुण मिळवून दोन्ही विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक मिळविला आहे, अथर्व ज्ञानेश्वर भटकर या विद्यार्थ्याने ८७.८०ज्ञ् गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे, कु. डिंपल संदीप कोयाकडे हिने ८७.४०ज्ञ् गुण मिळवून चतुर्थ क्रमांक प्राप्त केला असून कु. कृष्णाली गणेश सोनटक्के हिने ८७.२०ज्ञ् गुण मिळवून पाचव्या क्रमांकावर यश संपादन केलेले आहे.

उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकी विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थी संख्या २४ आहे, प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेले विद्यार्थी संख्या ५६ असून द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी संख्या ५० इतकी आहे. परीक्षेला एकूण प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या १६० असून त्यापैकी तब्बल १५५ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. महात्मा फुले विद्यालयातील विद्यार्थ्यांनी दहावी परीक्षेत उत्कृष्ट प्रकारे सुयश संपादन केल्याबद्दल शेगाव शहर तसेच तालुक्यातून सर्वत्र कौतुकांचा वर्षाव होत आहे.

# जिल्ह्यातील सहा सॉ-मिलवर धाड; ८०० घनमीटरहून अधिक लाकूड जप्त

## मध्य प्रदेशसह जळगाव जिल्ह्यातून बुलढाण्यात लाकूड तस्करीचा संशय

प्रतिनिधी १३ मे

**बुलढाणा:** जिल्ह्यातील अवैध लाकूड तस्करीविरोधात वन विभागाने मंगळवार, दि.१२ मे रोजी मोठी धडक कारवाई करत, सहा सॉ-मिलवर एकाचवेळी छापे टाकले. या कारवाईत ८०० घनमीटरहून अधिक संशयित अवैध लाकूड जप्त करण्यात आले असून, जप्त मुद्देमालाची किंमत ५० लाख रुपयांहून अधिक असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. नव्याने रुजू झालेले उपवनसंरक्षक जमीर शेख कारवाईत सहभागी झाल्याने जिल्ह्यातील लाकूड माफियांमध्ये खळबळ उडाली आहे.

गेल्या काही दिवसांपासून बाहेरील राज्यांतून सागवानासह इतर मौल्यवान लाकूड बुलढाण्यात आणून कागदपत्रांच्या आडून त्यावर प्रक्रिया केली जात असल्याचा संशय व्यक्त केला जात होता. या पार्श्वभूमीवर वनविभागाने ही कारवाई केली. पहिली कारवाई चिखली तालुक्यातील केळवद येथील विश्वकर्मा सॉ-मिलमध्ये करण्यात आली. सकाळी अचानक धाड टाकल्यानंतर तेथे मोठ्या प्रमाणावर सागवान, खैर, कडूनिंब तसेच कटसाइज लाकूड आढळून आले. वन अधिकाऱ्यांनी संबंधितांकडे परवान्याची विचारणा केली असता समाधानकारक कागदपत्रे सादर करण्यात आली नाहीत. प्राथमिक तपासात अंदाजे दहा लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, सॉ-मिल सील करण्याची प्रक्रिया हाती घेण्यात आली आहे. यानंतर मलकापूर शहरातील चार सॉ-मिलची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान नोंदी आणि प्रत्यक्ष साठा यामध्ये मोठी तफावत आढळून आली. मध्य प्रदेशातील खंडवा आणि बुऱ्हाणपूर तसेच जळगाव जिल्ह्यातूनही लाकूड बुलढाण्यात आणले जात असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, संध्याकाळी दसरखेड एमआयडीसी परिसरातील एका सॉ-मिलवरही छापा टाकण्यात आला. या कारवाईत संशयित अवैध लाकूडसाठा आढळून आल्याने वनविभागाने पुढील तपास सुरू केला आहे.अवैध लाकूड साठवले, तर थेट कारवाई!

गुप्त माहितीच्या आधारे जिल्ह्यातील सहा सॉ-मिलची तपासणी करण्यात आली. मोठ्या प्रमाणात संशयित अवैध लाकूड जप्त करण्यात आले असून, मोजमाप सुरू आहे. संबंधित सॉ-मिल चालकांविरुद्ध वनगुन्हे दाखल करण्यात येतील.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

बुधवार, दि. १३ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


## नगरसेवक गिरीश गोखले यांनी उपस्थित केला मुद्दा

**अकोला :** प्रभाग क्रमांक ५ मधील लहान उमरी परिसरातील क्रांतीकारक शहीद भगतसिंग यांचा पुतळा आहे. त्या ठिकाणी नागरिकांनी संतापाच्या भरात कचरा फेकला होता. या ठिकाणी महापालिका कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणाने हा सर्व प्रकार झाला. या सर्व प्रकारावर आज महासभेत भाजप नगरसेवक ॲड.गिरिश गोखले यांनी अधिकाऱ्यांचा वर्ग घेतला. राम नगर प्रभागातील लहान उमरी नाक्यावर घाणीचा व कचऱ्याच्या दुर्गंधीमुळे शहिदांचे स्मारक परिसरात झालेल्या वादावर भाजप नगरसेवक गिरिश गोखले यांनी सभागृहात अधिकाऱ्यांचा वर्ग घेतला. त्यांनी कचरा साफ सफाई नियमित झाली तर लोकांचा रोष राहत नाही. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणाने सत्तापक्ष बदनाम होत असेल तर आम्ही खपवून घेणार नाही असा इशारा ही ॲड.गिरिश गोखले यांनी दिला. प्रशासनाच्या आपसातील 'कचरा' युद्धात अकोलेकरांचे आरोग्य जपले पाहिजे असे ठाम मत गिरिश गोखले यांनी व्यक्त केले.

# अमरावतीला 'एअर कूल्ड' कवच, मग अकोल्याला उन्हाचे चटके का?

## तापमानात अकोला अव्वल, पण सुविधांमध्ये पिछाडीवर!

प्रतिनिधी १३ मे

**अमरावती / अकोला :** विदर्भातील तापमानाचा पारा सध्या ४५ अंशांच्या पार गेला असून, अकोला शहर अक्षरशः लाहीलाही होत आहे. अशा भीषण उन्हात अकोल्याचे वाहतूक पोलीस रस्त्यावर उभं राहून कर्तव्य बजावत आहेत. मात्र, शेजारच्या अमरावती जिल्ह्यातील पोलिसांना प्रशासनाने उष्णतेपासून वाचवण्यासाठी आधुनिक 'एअर कूल्ड' जॅकेट उपलब्ध करून दिले असताना, अकोल्याच्या पोलिसांच्या नशिबी मात्र फक्त रणरणते ऊनच का? असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे.




### अमरावतीत थंडावा, अकोल्यात लाहीलाही!

अमरावती पोलीस प्रशासनाने आपल्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेत त्यांना हायटेक 'कूलिंग जॅकेट्स'चे वाटप केले आहे. हे जॅकेट शरीराचे तापमान नियंत्रित ठेवण्यास मदत करतात. मात्र, अमरावतीपेक्षा जास्त तापमान असलेल्या अकोल्यात मात्र अद्याप अशा कोणत्याही सुविधा पोलिसांना मिळालेल्या नाहीत. प्रशासनाच्या या दुजाभावामुळे अकोला पोलीस दलात आणि सामान्य जनतेत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.




### पोलिसांच्या आरोग्याशी खेळ सुरूच

अकोला वाहतूक शाखेचे पोलीस कर्मचारी भर उन्हात उभे राहून वाहतुकीचे नियमन करतात. डांबरी रस्त्यावरून येणारी उष्णता आणि वरून पडणारे कडक ऊन यामुळे पोलिसांना उष्माघाताचा मोठा धोका निर्माण झाला आहे. 'अकोल्यातील पारा ४५ पार असतानाही आमच्या पोलिसांना सुविधांसाठी किती दिवस वाट पाहावी लागणार?' असा प्रश्न विचारला जात आहे.




### एअर कूल्ड जॅकेटसाठी मुहूर्त कधी लागणार?

नाविण्यपुर्ण योजनेत हे एअर कुल्ड जॅकेट घेता आले असते. किंवा पोलिस कल्याण निधीतून वाहतुक पोलिसांसाठी एअर कुल्ड जॅकेट घेता आले असते. पण, केवळ आश्वासनांचा पाऊस न पाडता प्रत्यक्ष कृती करून पोलिसांना उन्हापासून वाचवण्यासाठी हे 'कवच' कधी मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नागपूर हवामान विभागाने अकोल्यात १६ मे पर्यंत उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. आजचे तापमान ४३अंश सेल्सिअस असून पुढील दोन दिवसात ते ४५ अंशांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत पोलिसांना तातडीने मदतीची गरज आहे.

## खरीप हंगामात बळीराजाची वाढली चिंता

♦ रासायनिक खते, बियाणे किमतीमध्ये वाढ

प्रतिनिधी १३ मे

**अकोला :** खरीप हंगामाच्या तोंडावर रासायनिक खतांच्या किमतीत मोठी वाढ झाल्याने जिल्ह्यातील बळीराजा संकटात सापडला आहे. खतांच्या दरांनी उच्चांक गाठल्याने यावर्षी शेतीचा उत्पादन खर्च दुपटीने वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.

पिकांच्या उत्पादन खर्चात वाढ होत असताना, उत्पादित मालाला योग्य भाव मिळणार का? असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. मागील वर्षाच्या तुलनेत रासायनिक खतांच्या पोत्यामागे ४०० ते ९०० रुपयांची वाढ झाली आहे. ग्रामीण भागातील लहान कृषी केंद्र चालकही या दरवाढीमुळे चक्रावून गेले आहेत. चढ्या भावाने खते खरेदी करून शेतकऱ्यांना ती विकणे दुकानदारांसाठीही कठीण झाले आहे. त्यातच यंदा खतांचे 'रेशनिंग' होणार असल्याची चर्चा सुरू असल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. राज्य सरकार अनुदानाच्या माध्यमातून दिलासा देण्याचा प्रयत्न करत असले, तरी प्रत्यक्षात बाजारपेठेत शेतकऱ्यांना वाढीव दरांचाच फटका सहन करावा लागत आहे. खतांच्या वाढत्या किमतीमुळे शेती व्यवसाय आता कठीण झाला आहे. केंद्र सरकारने खताच्या दरात कपात करावी अन्यथा शेती क्षेत्रात अवलंबून असलेले सर्व घटक प्रभावित होतील, खातात झालेली दरवाढही शेतकऱ्यांच्या आटोक्याबाहेरील असून बळीराजा आता खरीप हंगाम मध्ये चिंतेत सापडण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## आगीत सिलिंडरचा स्फोट; वृद्ध महिलेचा होरपळून मृत्यू

### मलकापुरातील मुकुंदनगर परिसरातील घटना

प्रतिनिधी १३ मे

**मलकापूर :** शहरातील मुकुंदनगर परिसरात सोमवारी लागलेल्या भीषण आगीत घरातील गॅस सिलिंडरचा स्फोट होऊन एका वृद्ध महिलेचा होरपळून मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. नर्मदाबाई सुखदेव लासुरकर (वय ८५) या मुकुंदनगर परिसरातील टिनपत्र्याच्या भाड्याच्या घरात राहत होत्या. दुपारच्या सुमारास घराजवळील पालापाचोळ्याला अचानक आग लागली. सुरुवातीला किरकोळ असलेली आग काही वेळातच घरापर्यंत पोहोचली. त्यानंतर घरातील गॅस सिलिंडरचा जोरदार स्फोट झाला. या स्फोटात नर्मदाबाई लासुरकर गंभीररीत्या होरपळल्या आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. नगरपालिका उपाध्यक्ष अनिल गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली अग्निशमन दलाने घटनास्थळी दाखल होत आगीवर नियंत्रण मिळविले. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच सरपंच ज्ञानदेव ढगे तसेच उद्योजक मनीष लखानी यांनीही घटनास्थळी भेट देत मदतकार्यात सहभाग घेतला. शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गणेश गिरी व त्यांच्या सहकाऱ्यांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठविला.

## हमसफर एक्सप्रेसला दोन जनरल डबे लावा, काचीगुडा एक्सप्रेसची गती वाढवा

### विदर्भ यात्री संघाची रेल्वे मंत्र्यांकडे मागणी

प्रतिनिधी १३ मे

**अकोला :** नांदेड जम्मू तावी हमसफर एक्सप्रेसला दोन जनरल डबे लावण्यात यावे तसेच भगत की कोठी काचीगुडा एक्सप्रेसची गती वाढवा अशी मागणी विदर्भ यात्री संघातर्फे रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, रेल्वे राज्यमंत्री वीरन्ना सोमन्नाजी व रवनीत सिंग बिट्टू, रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष सतीश कुमार, दक्षिण मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक संजय कुमार श्रीवास्तव यांच्याकडे केली. मागील वर्षी सुरू करण्यात आलेली १७६०५/१७६०६ भगत की कोठी काचीगुडा एक्सप्रेस ही गाडी इतर गाड्यांच्या तुलनेत अधिक वेळ घेते. या गाडीची गती वाढवून या लांब पल्ल्याच्या गाडीतील प्रवाशांचा वेळ वाचवावा. अकोला तिरुपती, हिसार तिरुपती, मडगाव नागपूर इत्यादी विशेष गाड्या नियमित केल्याबद्दल आभार मानले. एका पत्रकाद्वारे संघाचे अध्यक्ष डॉ. रवी आलिमचंदानी, अशोक अग्रवाल, दीप मनवाणी, ॲड. मिश्रा, डॉ. कुलकर्णी, डॉ. गदरे, राजू कोटकर, मास्टर लवेश यांनी मागणी लावून धरली आहे.

## बार्शीटाकळी तालुक्यात एकाच दिवशी दोघांची आत्महत्या

प्रतिनिधी १३ मे

**अकोला :** बार्शीटाकळी पोलीस स्टेशन हद्दीतील मौजे महान नजीकच्या धाबा रस्त्यावर एकाच दिवशी दोन व्यक्तींनी आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे, या घटनेमुळे संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आत्महत्या केलेल्या व्यक्तींमध्ये किशोर सोनटक्के रा. कानडी बाजार, पोलीस स्टेशन पिंजर हद्द तसेच किशोर बोडके वय ४० वर्षे रा. मगरूळपीर यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, या दोन्ही व्यक्तींबाबत पिंजर पोलीस स्टेशनमध्ये यापूर्वी मिसिंग दाखल करण्यात आले होते. ोमवारी रोजी ही घटना उघडकीस येताच परिसरात एकच खळबळ उडाली. घटनास्थळ बार्शीटाकळी पोलीस स्टेशनच्या हद्दीत येत असल्याने ठाणेदार प्रवीण धुमाळ यांनी आपल्या पोलिस ताफ्यासह तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून दोन्ही प्रकरणांमध्ये मर्ग दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलीस या बाबत तपास करीत आहेत.

## हिवरखेड सोनाळा रस्त्यावर टँकरने पाणी

प्रतिनिधी १३ मे

**हिवरखेड:** हिवरखेड सोनाळा मार्गावर धुळीचा प्रवाशांना त्रास होत आहे. बांधकाम विभागाने याकडे लक्ष द्यावी असे वृत्त दै. सुपरफास्ट ने प्रकाशित केले.

त्याचा लगेच परिणाम झाला असून रस्त्यावर टँकरने पाणी टाकले जात आहे. प्रवासी, शेतकरी, व्यापारी या सर्वांना उडणा-या धुळीमुळे त्रास सहन करावा लागत आहे. कारण रस्त्याचे डांबरीकरण जोवर होत नाही तोपर्यंत ही समस्या आहे. त्यामुळे काही तरी उपाय योजावा अशी मागणी वारंवार होत होती. अखेर यंत्रणा जागी झाली असून



धुळीच्या रस्त्यावर पाणी टाकले जात आहे. धूळ उडणार नाही याकडे लक्ष दिले जात आहे.

# खतांच्या वाढत्या किमतीने यंदा मोडणार शेतकऱ्यांचे कंबरडे!

प्रतिनिधी १३ मे

**अकोला :** रासायनिक खतांच्या दरातील प्रचंड वाढीमुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांचे कंबरडे आणखी मोडले आहे. विविध खतांच्या किमतीत प्रति पोते २५ ते ३७५ रुपयांपर्यंत झालेल्या दरवाढीमुळे सामान्य शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या नवीन दरांमुळे खरीप हंगामाच्या सुरुवातीला शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च लक्षणीयरीत्या वाढणार आहे. गेल्या काही वर्षांपासून वाढत्या उत्पादन खर्चामुळे शेतकरी अडचणींचा सामना करत आहेत. आणि आता खतांच्या दरवाढीने त्यांच्या समस्या आणखी वाढवल्या आहेत. युरिया, डीएपी, १०:२६:२६ आणि २०:२०:०:१३ यांसारख्या प्रमुख खतांच्या दरात लक्षणीय वाढ झाली आहे. काही खतांच्या दरात ३०० रुपयांपर्यंत वाढ होणार असल्याचे सांगितले जात आहे. तज्ज्ञांच्या मते, आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या मालाच्या वाढत्या किमती, आयात खर्च, वाहतूक खर्च आणि अनुदान वितरणातील विलंब ही दरवाढीची मुख्य कारणे आहेत. तथापि, या सर्वांचा थेट परिणाम शेतकऱ्यांवर होत आहे. रासायनिक खतांच्या वाढलेल्या किमतींमुळे प्रति एकर उत्पादन खर्च वाढण्याची शक्यता असून, त्याचा पिकांच्या उत्पन्नावर परिणाम होऊ शकतो. यामुळे शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा आणखी वाढेल आणि कृषी नुकसानीची भीती निर्माण होईल. शेतकऱ्यांचा आरोप आहे की, अनुदान वेळेवर न मिळाल्यामुळे ही दरवाढ झाली आहे.

### दुहेरी ओझे सहन करावे लागत आहे

◆ आम्हाला घर चालवावे लागते, शेती करावी लागते आणि आता खतासाठीही एवढा मोठा खर्च करावा लागत आहे. सरकारने आमच्यासाठी काय केले आहे? महिलांवर दुहेरी ओझे लादले गेले आहे.

**एक महिला** शेतकरी दगड़पारवा

### आम्ही शेती कशी करणार?

◆ पिकांना आधीच योग्य भाव मिळत नाही. खताच्या वाढत्या किमतींनी शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. उत्पादन खर्च वाढला असेल तर आम्ही शेती कशी करणार? सरकारने तातडीने हस्तक्षेप न केल्यास शेतकरी रस्त्यावर उतरतील.

**पिंजर येथील एक शेतकरी**

## जप्त दुचाकी सह युवक आदळला भर रस्त्यावर

### जिल्हाधिकारी कार्यालय चौकातील घटना

प्रतिनिधी १३ मे

**अकोला :** शहर वाहतूक नियंत्रण शाखेतर्फे शहरातील नियम तोडणाऱ्या वाहन चालकांवर जप्तीची कारवाई करण्यात येते. अशाच एका जप्त केलेल्या वाहनासह टोईंग पथकात काम करणारा युवक भर रस्त्यावर आदळल्याची घटना घडली.

अकोला शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी या करिता वाहतूक नियंत्रण विभागाच्या वतीने अनधिकृत ठिकाणी वाहने उभी करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी टोइंग पथक कार्यान्वित करण्यात आले आहे. आज याच टोइंग पथकाच्या वाहनातून जप्त केलेल्या दुचाकी सह पथकात काम करणारा एक युवक अचानक भर रस्त्यावर आदळला. यामध्ये सुदैवाने युवक बचावला. तो जखमी झाला नाही मात्र जप्त करण्यात आलेल्या वाहनाचे नुकसान झाले. नागरिकांच्या म्हणण्या नुसार ज्या भागात जास्त प्रमाणात दुचाकी भर रस्त्यावर उभ्या राहतात त्या ठिकाणी टोइंग पथक कारवाई करीत नसून हेतुपुरस्पर गोर गरीब नागरिकांची वाहने जप्त करून त्यांना आर्थिक भुर्दंड वाहतूक विभाग देत असल्याचा आरोप नागरिक करीत आहे. जास्त पैसे कमवण्याच्या नादात क्षमतेपेक्षा जास्त वाहने टोइंग पथकाच्या वाहनात भरण्यात येतात. त्यामुळे अनेक वाहनाचे नुकसान होत असल्याचा आरोप सुद्धा या वेळी नागरिकांनी केला आहे. आजच्या या घटने मध्ये नुकसान ग्रस्त वाहनचालकाल त्याच्या वाहनाचा भुर्दंड शहर वाहतूक नियंत्रण विभाग देणार का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.



## सेवा सहकारी सोसायट्या सर्वांगाने सक्षम व्हाव्यात – डॉ.जयराज कोरपे

प्रतिनिधी १३ मे

**अकोला :** सेवा सहकारी सोसायटी हा ग्रामीण सहकार व्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे अकोला आणि वाशिम जिल्ह्यातील सर्व सेवा सहकारी सोसायट्या आर्थिक, तांत्रिक आणि प्रशासकीयदृष्ट्या सक्षम झाल्या पाहिजेत. काही सोसायट्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रगत झाल्या असल्या तरी उर्वरित सर्व ८३५ सोसायट्यांचेही सर्वांगीण बळकटीकरण होणे काळाची गरज आहे. त्यातुन शेतकरी, खातेदार आणि ग्रामीण भागाची आर्थिक उन्नती साधली जाईल आणि पर्यायाने सहकार क्षेत्र अधिक मजबुत बनेल असे प्रतिपादन अकोला - वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे नवनिर्वाचीत अध्यक्ष डॉ. जयराज कोरपे यांनी केले.सेवा सहकारी सोसायटी मनब्दाच्या नवीन इमारतीच्या उद्घाटन सोहळ्यात बोलत होते. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी, संचालक मंडळ सदस्य, शेतकरी आणि खातेदार मो'या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलतांना डॉ. कोरपे यांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासात सेवा सहकारी सोसायट्यांची भूमिका अत्यंत महत्वाची असल्याचे सांगीतले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, डिजिटल व्यवहार, पारदर्शक कारभार आणि शेतकऱ्यांना सुलभ कर्जपुरव'ा यामुळे सोसायट्यांची विश्वासार्हता अधिक वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमात अकोला व वाशिम जिल्हा प्राथ. कृषी सह. पत संस्थांचा संघ मर्या. अकोला चे अध्यक्ष डॉ. संतोषकुमार कोरपे बोलतांना म्हणाले की, सहकाराच्या निकोप वाढीसा'ी सर्वांनी एकत्र येवून कार्य करणे ही काळाची गरज आहे. सेवा सहकारी सोसायट्यांच्या मजबुतीकरणासा'ी बँक सर्वतोपरी सहकार्य करीत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अत्यल्प व्याजदारात विविध कर्जसुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. अकोला आणि वाशिम जिल्ह्यातील सर्व सेवा सहकारी सोसायट्यांनी या योजनांचा लाभ घ्यावा आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीस हातभार लावावा असे आवाहन त्यांनी केले.

नवीन इमारतीच्या माध्यमातून सोसायटीच्या कामकाजाला अधिक गती मिळणार असून शेतकरी व सभासदांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होतील, असा विश्वास उपस्थितांनी त्यांचे मनोगतातून व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्तावीक बँकेचे संचालक संदिपभाऊ खारोडे यांनी केले. या कार्यक्रमासा'ी बँकेच्या माजी संचालीका सौ.रूपालीताई खारोडे उपस्थित होत्या. याप्रसंगी सोसायटीचे जेष्ठ सदस्य अंबादास राऊत, दादाराव पाथ्रीकर, शालीग्राम पाथ्रीकर, जिनिंग प्रेसिंगचे अध्यक्ष शेषराव पाथ्रीकर, कृषी उत्पन्न बाजार समिती तेल्हारा चे माजी सभापती रमेश दारोकार संचालक शातांराम काळे, दामोदर मार्के, रविंद्र बिहाडे, लखन राजनकर, अडगांव सोसायटीचे अध्यक्ष मनोहरलाल फाफट, खंडाळा सोसायटीचे अध्यक्ष गजानन वानखडे, मनब्दा सोसायटीचे अध्यक्ष नरेंद्र पाथ्रीकर, उपाध्यक्ष रामु राऊत, गजानन बाघोळे, मुन्ना पाथ्रीकर शेषराव पोहरकर, शंकरराव ताथोड, पांडुरंग चिमणकर, ॲड.गजाननराव तराळे, खरेदी विक्री संस्थेचे संचालक पुंडलिकराव खारोडे, चंद्रकांत ताथोड, शरद आखरे, अरूण तेल्हारकर, राधेशाम भदे, पंकज आढे व परिसरातील इतर सेवा सहकारी सोसायटीचे संचालक मंडळ, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनंत वैद्य उपस्थित होते. यावेळी सदर कार्यक्रमात तेल्हारा तालुक्याच्या वतीने बँकेचे अध्यक्ष डॉ. जयराज कोरपे व बँकेचे संचालक संदिपभाऊ खारोडे यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. तसेच आदर्श गाव मनब्दाच्या सरपंच सौ.सिमाताई पाथ्रीकर यांनी सोसायटीचे संभाव्य गोडाऊन योजनेकरीता सोसायटीला मो'ी जागा उपलब्ध करून दिली त्याबद्दल त्यांचा यथोचीत सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला तालुक्यातील मो'या संख्येने नागरीक सोसायट्यांचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन डिगांबर चिकटे तर आभार प्रदर्शन प्रमोद चांदुरकर यांनी केले.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724 - 2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK